❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती **बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६** ❖ पाने : ८ ❖ अंक : २८९ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



राहुल गांधींनी २०२९ च्या पराभवासाठी तयार राहावं

SIR च्या नावाखाली ते घुसखोरांना संरक्षण देत आहेत, अमित शाहांचा हल्लाबोल




अमित शाह यांनी राहुल गांधींवर जोरदार हल्ला चढवला

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, जे लोक निकालांसाठी मतदान यंत्रांना दोष देतात, त्यांना मी सांगू इच्छितो की या निवडणुका मतपत्रिका वापरून घेण्यात आल्या होत्या. भाजप मतदान यंत्रांमुळे निवडणुका जिंकतो, हा युक्तिवाद यामुळे पूर्णपणे खोटा ठरतो. गेल्या 33 वर्षांत त्रिपुरामध्ये काँग्रेसचा एकही मुख्यमंत्री जिंकलेला नाही. गेल्या 54 वर्षांत बंगालमध्ये काँग्रेस पक्ष जिंकलेला नाही. बंगाल, त्रिपुरा आणि गुजरातसारख्या राज्यांमध्ये काँग्रेस पक्षाला तीन, चार किंवा अगदी पाच दशकांपासून पराभवाला सामोरे जावे लागत आहे. मला राहुल गांधींना थेट विचारायचे आहे: हा एसआयआरचा (SIR) परिणाम आहे का? एसआयआर 2024 नंतर लागू करण्यात आला. तुम्ही काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते, नंतर पक्षाध्यक्ष आणि विरोधी पक्षनेते झाल्यापासून, पक्ष सातत्याने निवडणुका हरत आहे.

■ मुंबई (दै. संध्या)

राहुल गांधी हे एसआयआरच्या नावाखाली घुसखोरांना संरक्षण देत असल्याची टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली. राहुल गांधींनी भाजपच्या विजयातून धडा घेण्याचे आणि काँग्रेसला आपल्या पराभवावर आत्मपरीक्षण करण्याचे आवाहन केले. राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनाही 2029 मध्ये मोठ्या पराभवासाठी तयार रहावे असेही शाह म्हणाले. गुजरात पालिका निवडणुकीत भाजपच्या प्रभावी कामगिरीनंतर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एसआयआरचा संदर्भ देत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला. त्यांनी विचारले की, एसआयआरमुळेच काँग्रेसला गुजरातमध्ये 41 वर्षे विजय मिळवता आला नाही का? आज संपूर्ण देश पंतप्रधानांसोबत आहे, असे ते म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राहुल गांधी यांना पुढच्या लोकसभा निवडणुकीत आणखी एका पराभवासाठी तयार राहण्याचे आवाहन केले. राहुल गांधी यांना भाजपच्या विजयातून धडा घेण्याचे आणि काँग्रेसला आपल्या पराभवावर आत्मपरीक्षण करण्याचे आवाहन केले. गृहमंत्री अमित शाह यांनी आरोप केला की, राहुल गांधी घुसखोरांना संरक्षण देण्यासाठी एसआयआरचा बहाणा म्हणून वापर करत आहेत. आज गुजरातमध्ये तीन नगरपालिका आणि महानगरपालिकांसाठी निवडणुका झाल्या. या दोन नगरपालिका आणि एका महानगरपालिकेतील 104 जागांपैकी 90 जागा जिंकून भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवला. माझ्या मतदारसंघात येणाऱ्या गांधीनगर महानगरपालिकेत भाजपने 44 पैकी 38 जागा जिंकल्या. आम आदमी पक्षाने सर्व 32 जागा लढवल्या, परंतु प्रत्येक जागेवर त्यांची अनामत रक्कम जप्त झाली. गुजरातमधील हा दणदणीत विजय राज्यातील मतदारांचा मूड दर्शवतो आणि हे सिद्ध करतो की गुजरातची जनता नरेंद्र मोदींसोबत खंबीरपणे उभी आहे. मागील निवडणुकीच्या तुलनेत गांधीनगर महानगरपालिकेत भाजपच्या मतांचा वाटा 10 टक्क्यांनी वाढला आहे. मला हे स्पष्ट करायचे आहे, आणि विशेषतः राहुल गांधींना, की काँग्रेस पक्षाने 41 वर्षांत एकही निवडणूक जिंकलेली नाही. ते शेवटची निवडणूक 1985 मध्ये जिंकले होते. तेव्हापासून त्यांना गुजरातमध्ये सतत पराभवाला सामोरे जावे लागले आहे.



थोडक्यात...

सायबर फसवणुकीचा नवा फंडा

गडचिरोली : दैनिक संध्या

सध्या सायबर गुन्हेगारीच्या घटना सातत्याने वाढत आहेत. त्यामध्ये, फेक फोनकॉलद्वारे फसवणूक करणे, एखाद्या लिंकच्या माध्यमातून मोबाईल बँक खाते हॅक करणे अशाही घटना घडत आहेत. त्यातच, गडचिरोलीत सायबर फसवणुकीच्या दोन वेगवेगळ्या प्रकरणांचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. विशेष म्हणजे, या कारवाईत तब्बल एक कोटी चार लाख रुपयांहून अधिक रकमेच्या संशयास्पद व्यवहारांचं प्रकरण उघडकीस आणत तिघांना अटक केली आहे. जुही मेश्राम, सात्विक सावडिया आणि साहिल खान अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. मैत्रीचा विश्वास संपादन करुन सात तरुणींच्या नावावर बँक खाती उघडायची. त्यानंतर या खात्यांचा वापर आर्थिक व्यवहारांसाठी करायचा, अशा प्रकारातून कोट्यवधींचे व्यवहार झाल्याचं समोर आले. या प्रकरणात एका तरुणीसह तिच्या मित्राला पोलिसांनी अटक केली. तर दुसऱ्या प्रकरणात सोशल मीडियावर बेडशीट विक्रीची बनावट जाहिराती देऊन ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या राजस्थानमधील आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. अवघ्या 1 हजार 550 रुपयांच्या फसवणुकीचा तपास करत पोलिसांनी थेट राजस्थानपर्यंत धडक दिली. दरम्यान, या दोन्ही प्रकरणांमध्ये गडचिरोली पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या मदतीने आरोपींचा माग काढलाय.

बिहारच्या राजकारणात मोठी उलथापालथ होणार

मुंबई : दैनिक संध्या

बिहारच्या राजकारणातून एक मोठी बातमी समोर आली आहे. बिहारमधील एनडीए सरकारकडे प्रचंड बहुमत आहे. मात्र नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यापासून जेडीयू भाजपमध्ये विलीन होईल असा दावा विरोधी पक्ष करताना दिसून येत आहे. यावर आता एक अशी घडामोड समोर आली, ज्यामुळे बिहारमध्ये राजकीय खळबळ उडाली आहे. जेडीयू आणि भाजप विलयाची तारीखही ठरल्याचा दावा करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी दिल्लीतील भाजप मुख्यालयात पत्रकार परिषद घेतली होती. यावेळी जेडीयू नेते आणि केंद्रीय मंत्री ललन सिंह हेही उपस्थित होते. आता तो फोटो समोर आल्यानंतर राजकारण सुरू झाले आहे. आरजेडी आणि काँग्रेसने यावर प्रतिक्रिया दिली आहे. पत्रकार परिषदेतील फोटोवर प्रतिक्रिया देताना आरजेडीच्या राष्ट्रीय प्रवक्त्या प्रियांका भारती यांनी इन्स्टाग्रामवर लिहिले, जेडीयू आता कधीही भाजपसोबतच्या विलीनीकरणाची घोषणा करू शकते. समाजवाद विकताना ते जातीयवादी दुकानाचे विक्रेते बनले आहेत, असं त्या म्हणाल्या. यानंतर चर्चांना उधाण आले आहे. यावर बिहार काँग्रेसचे प्रवक्ते डॉ. स्नेहाशीष वर्धन म्हणाले की, भाजपने आपल्या आघाडीतील भागीदारांमध्येही स्लीपर सेल पुन्हा स्थापन केले आहेत.

एकनाथ शिंदे नाराज झाले तर मोठा स्फोट होईल; सरकार बदलेल

उपमुख्यमंत्र्यांच्या नाराजीच्या चर्चेवर बच्चू कडूंचे विधान

■ अमरावती/मुंबई (दै. संध्या)

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महायुतीमध्ये नाराज असल्याची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. काही महत्त्वाच्या बैठकांना त्यांनी मारलेली दांडी आणि दिल्ली दौऱ्यामुळे या चर्चांना अधिक उधाण आलं आहे. याच चर्चेवर आता शिवसेनेचे आमदार बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. "एकनाथ शिंदे साहेब नाराज नाहीत, पण ते जर नाराज झाले, तर थेट स्फोटच होईल आणि सरकार बदलून जाईल," असं अत्यंत सूचक विधान बच्चू कडू यांनी केलं आहे. अमरावतीमध्ये एका वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी ही फटकेबाजी केली आहे. बच्चू कडू म्हणाले, एकनाथ शिंदे नाराज होत नाहीत, मला माहीत आहे ते सदाबहार आहेत. त्यामुळे कुणीही त्याची चिंता करू नये. पण ते जर नाराज झाले, तर स्फोट झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे त्यांना कोणीही नाराज करू नये, एवढीच माझी विनंती आहे." कडू यांच्या या विधानामुळे महायुतीत सर्वकाही आलबेल आहे का, असा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. शिंदे यांनी दोन दिवसांपूर्वी दुष्काळाच्या बैठकीला आणि काल वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीला दांडी मारल्याबद्दल पत्रकारांनी विचारले असता, बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्र्यांची पाठराखण केली. "त्यांना काही काम असेल म्हणून ते उपस्थित राहू शकले नसतील. पण शिवसेनेचे बाकीचे मंत्री तर तिथे हजर होते ना," असे सांगत त्यांनी या विषयावर पडदा



टाकला. महायुतीमध्ये अंतर्गत मतभेद आहेत का, या प्रश्नावर बोलताना कडू यांनी स्पष्ट केले की, "मला नाही वाटत काही मतभेद आहेत. निवडणुकीच्या काळात कोणतेही छोटे-मोठे पक्ष मतभेद करत बसत नाहीत. सर्वांना आपापले उमेदवार जिंकून आणायचे असतात. त्यामुळे निवडणुकीनंतर जे काही होईल ते मला माहीत नाही, पण सध्या तसे काही नाही." बच्चू कडू यांनी आपल्या खास शैलीत महायुतीतील नेत्यांना सूचक इशारा दिला. "नाराज झाले तर स्फोटच होणार ना! एकनाथजी शिंदे साहेब तिकडे नाराज झाले तर थेट स्फोटच होईल आणि आम्हाला माहीत आहे, सरकार बदलून जातं. त्यामुळे हे मोठे नेते कधी सहसा नाराज होत नसतात," असेही कडू यांनी स्पष्ट केले.

'ज्ञानेश कुमार राजीनामा देणार नाहीत, त्यांना पदावर ठेवणं मोदींसाठी गरजेचं'

पृथ्वीराज चव्हाणांचा दावा, केंद्र आणि राज्य सरकारवरही निशाणा



'आंदोलन दडपण्याचा प्रयत्न, पण सरकारला ते शक्य झाले नाही'

विरोधक देशात अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याच्या आरोपावर पृथ्वीराज चव्हाण यांनी आक्षेप घेतला. आंदोलन करणे, सरकारच्या निर्णयांना विरोध करणे आणि आपल्या मागण्या मांडणे हा नागरिकांना संविधानाने दिलेला अधिकार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'आंदोलन करणे हा आमचा संविधानिक अधिकार आहे. सरकार तो अधिकार वापरू देत नाही. अनेक युवक नेते आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सना ताब्यात घेण्यात आल्याचे आपण पाहिले आहे. आंदोलन दडपण्यासाठी विविध मार्गांचा वापर केला जात आहे. मग याला अराजकता कसे म्हणता येईल?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

■ पुणे(दै. संध्या)

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून देशातील राजकीय वातावरण तापले असताना, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी महत्त्वाची विधाने केली आहेत. ज्ञानेश कुमार सहजासहजी राजीनामा देणार नाहीत, असे मत व्यक्त करत त्यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिल्यास निवडणूक प्रक्रियेबाबत सरकारची भूमिका अडचणीत येऊ शकते, असा दावा चव्हाण यांनी केला. विरोधी पक्षांचे आंदोलन हा अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न नसून, तो लोकशाहीने दिलेल्या अधिकारांचा भाग असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत पृथ्वीराज चव्हाण यांनी देशातील युवकांचे आंदोलन, निवडणूक आयोगाचा कारभार, सरन्यायाधीशांना निवेदन देण्याचा विरोधकांचा प्रयत्न, महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती, राज्य सरकारचे कामकाज आणि आगामी राजकीय घडामोडींवर भाष्य केले. केंद्र आणि राज्य सरकार केवळ जाहिरातबाजीवर भर देत असल्याचा आरोप करत दोन्ही सरकारांना सत्तेतून खाली खेचण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले. देशभर सुरू असलेल्या आंदोलनाचे विश्लेषण करताना पृथ्वीराज चव्हाण यांनी या आंदोलनाचे दोन प्रमुख भाग असल्याचे सांगितले. एकीकडे इंडिया आघाडीतील विरोधी पक्षांचे आंदोलन सुरू आहे, तर दुसरीकडे विविध राजकीय पार्श्वभूमीतील युवक आणि विद्यार्थी स्वतंत्रपणे रस्त्यावर उतरले आहेत. NEET परीक्षेतील कथित घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर युवकांच्या आंदोलनाला सुरुवात झाली असली, तरी त्यामागे बेरोजगारी, भविष्याबाबतची अनिश्चितता आणि सरकारच्या कार्यक्षमतेविषयी निर्माण झालेली नाराजी ही व्यापक कारणे असल्याचे त्यांनी नमूद केले. दिल्लीत झालेल्या आंदोलनाचा उल्लेख करत त्यांनी या आंदोलनात राजकीय पक्षांचे नेते, विद्यार्थी आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाल्याचा दावा केला. भारतीय जनता पक्षाला यापूर्वी मतदान करणारे तरुणही आंदोलनात सहभागी झाल्याचे त्यांनी सांगितले. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात पोलीस आणि निमलष्करी दल तैनात करण्यात आल्याचा उल्लेख करत सरकार आंदोलनामुळे घाबरले असल्याची टीका त्यांनी केली. त्यांच्या मते, आतापर्यंत सरकारने लोकप्रियतेची प्रतिमा निर्माण करण्यावर भर दिला; मात्र आता निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबतच प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे केवळ प्रतिमेच्या आधारावर राजकारण करणे सरकारसाठी यापुढे सोपे राहणार नाही, असेही ते म्हणाले. विरोधी पक्षांचे नेते आणि युवकांनी पक्षांचे झेंडे बाजूला ठेवून राष्ट्रीय ध्वज हातात घेत आंदोलनात सहभाग घेतल्याचा उल्लेख करत त्यांनी या आंदोलनाचे महत्त्व अधोरेखित केले. सरकारने आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला, तरी युवकांमधील नाराजी संपणार नसल्याचा दावा त्यांनी केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर बोलताना पृथ्वीराज चव्हाण यांनी ते पद सोडतील, असे आपल्याला वाटत नसल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या मते, ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घेणे म्हणजे निवडणूक प्रक्रियेबाबत उपस्थित झालेल्या आरोपांवर सरकारने अप्रत्यक्षपणे जबाबदारी स्वीकारल्यासारखे होईल.

काही जण परदेशी शक्तींचे बाहुले झालेत

कालचा दिवस देशाच्या इतिहासातील काळा दिवस, राहुल गांधींच्या मोर्चावर एकनाथ शिंदेंची टीका

■ मुंबई (दै. संध्या)

संविधान हातात घेत ते धोक्यात आहे, असे म्हणत ते कसे नष्ट होईल, हे काम काँग्रेस आणि इंडिया आघाडीकडून सुरू आहे. लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम त्यांच्याकडून सुरू आहे. दिल्लीत जी काही राजकीय आंदोलने झाली, ती काही साधी बाब नाही; हे देशासाठी घातक आहे. अनेक परकीय शक्ती देशाला अस्थिर करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. काही जण परदेशी शक्तींचे बाहुले झाले आहेत. हा सर्व आंतरराष्ट्रीय कटकारस्थानाचा भाग असल्याची शंका येत असून, देशाला अशांत करण्याचे आणि अराजकता माजवण्याचे कृत्य विरोधी पक्षाकडून सुरू आहे; जे अतिशय दुर्दैवी असून देशासाठी घातक आहे, असेही ते म्हणाले.

एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, कालचा दिवस हा देशाच्या इतिहासातील काळा दिवस होता; कारण देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इंडिया आघाडीने सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढत दबाव आणण्याचा प्रयत्न केला. यापूर्वी असे कधीही झाले नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने ज्या सर्व घटनात्मक संस्था उभ्या केल्या आहेत, त्यांच्यावर चाल करत जाणे आणि दबाव आणणे, ही घटना काल घडली. या कृत्यासाठी मी राहुल गांधी आणि इंडिया आघाडीचा निषेध करतो. त्यांना न्यायव्यवस्थेकडून न्याय मिळवण्याचा अधिकार आहे, पण अशा प्रकारे मोर्चा काढणे म्हणजेच न्यायव्यवस्थेचा अपमान आहे. त्यांनी याबद्दल माफी मागितली पाहिजे.

एकनाथ शिंदे म्हणाले की, विरोधी पक्ष आपल्या शेजारील देशांमध्ये काय झाले, याची उदाहरणे कायम देत असतात. त्यांना यातून नेमका कोणता संदेश द्यायचा आहे? त्यांना देश अस्थिर करायचा संदेश द्यायचा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर तीन वेळा पराभव झाल्यामुळे, आपल्याला निवडणुकीत जिंकता येणार नाही, याची खात्री विरोधकांना पटली आहे.



..तिथे विरोधी पक्षाने व्होट चोरी केली का?

एकनाथ शिंदे म्हणाले की, निवडणूक आयोगावर टीका करणारे विरोधी पक्षातील नेते हे विसरतात की, याच निवडणूक आयोगाने घेतलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये ते केरळ, कर्नाटक, तेलंगणा, तामिळनाडू यांसारख्या राज्यांमध्ये जिंकले होते, मग तिथे काय त्यांनी मते चोरली होती का? असा सवाल त्यांनी केला. देशाच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे काम हे लोक करत आहेत.

UPI वर 0.4% शुल्क दिवाळीपर्यंत टळले

१५ ऑक्टोबरपासून ₹2000हून जास्तच्या पेमेंटवर लागणार होते; सणासुदीमुळे घेतला निर्णय

■ मुंबई (दै. संध्या)

UPI पेमेंटवर आकारले जाणारे शुल्क दिवाळीपर्यंत पुढे ढकलण्यात आले आहे. हे शुल्क यापूर्वी १५ ऑक्टोबरपासून लागू होणार होते. यामध्ये ₹२,००० पेक्षा जास्त रकमेच्या UPI पेमेंटवर ०.४% शुल्क आकारले जाणार होते. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) ने सणासुदीचा काळ लक्षात घेऊन हा निर्णय पुढे ढकलला आहे. NPCI ने सांगितले आहे की, दिवाळीनंतर लगेच हे शुल्क लागू केले जाईल; मात्र अद्याप तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. 2000 पेक्षा जास्त रकमेवर दुकानदाराला मिळणाऱ्या पेमेंटवर 0.4% शुल्क आकारले जाईल. 75 हजार किंवा त्याहून अधिक रकमेच्या प्रत्येक व्यवहारावर 300 रुपये शुल्क. रेल्वे, दूरसंचार, विमा आणि इंधनासाठी 2000 पेक्षा जास्त रकमेच्या UPI पेमेंटवर 5 रुपये निश्चित शुल्क. मात्र सरकारने स्पष्ट केले की एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीला पैसे पाठवणे पूर्णपणे मोफत राहील. हे शुल्क दुकानदाराला द्यावे लागेल. मर्चंट डिस्काउंट रेट म्हणजेच MDR. व्यापारी किंवा दुकानदार डेबिट/क्रेडिट कार्ड किंवा डिजिटल पेमेंट (UPI) सुविधा, म्हणजेच पॉइंट ऑफ सेल मशीन किंवा पेमेंट गेटवे वापरतो, त्याबदल्यात बँक आणि पेमेंट सेवा प्रदात्यांना देत असलेले हे शुल्क असते. हे शुल्क डिजिटल पायाभूत सुविधा आणि हस्तांतरण नेटवर्क योग्यरीत्या चालवण्याचा खर्च भागवण्यासाठी आकारला जातो. हा शुल्क व्यापाऱ्याने भरायचा असतो, ग्राहकाने नाही. मोठ्या व्यापाऱ्यांवर 0.4% शुल्क: महिन्याला ₹1 लाखांपेक्षा जास्त कमाई करणाऱ्या व्यापाऱ्यांना ₹2,000 पेक्षा जास्त रकमेचे प्रत्येक पेमेंट स्वीकारताना 0.4% MDR+GST भरावा लागेल. MDR शुल्कावर 18% GST आकारला जाईल.

ज्या व्यापाऱ्यांची UPI द्वारे महिन्याची एकूण कमाई ₹1 लाखांपर्यंत आहे, त्यांच्यावर कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, व्यवहाराची रक्कम ₹2,000 पेक्षा जास्त असली तरीही. श्रेणी बदलण्याचा नियम: एखादा लहान दुकानदार सलग 3 महिने ₹1 लाखांपेक्षा जास्त UPI कलेक्शन स्वीकारत असेल, तर बँका त्याला आपोआप 'मोठा व्यापारी' (पर्सन-टू-मर्चंट) या श्रेणीत हलवतील.



संपादकीय

आंदोलने लोकशाहीचा गाभा

मतदार यादीची विशेष सखोल तपासणी करून आणि निवडणूक आयोगाचे अध्यक्ष ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात तसेच पुण्यात एमपीएससी पेपर फुटी विरोधात आंदोलनामुळे देशातील वातावरण सध्या अस्वस्थ आहे. (एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन तूर्तास स्थगित झालेले आहे) महाराष्ट्रात पुणे. मुंबई पासून दिल्लीपर्यंत आंदोलने होत आहेत.एस आय आर मध्ये गोंधळ झाल्याचा आरोप करीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी कॉंक्रोच जनता पार्टीने आता आंदोलनाचा निर्धार कायम केलेला आहे.विरोधी पक्षही सक्रियपणे आंदोलनात उतरलेले आहे. लोकशाहीत आंदोलन करणे हा नागरिकांचा हक्क असला तरी या हक्काचे रक्षण करण्याच्या नावाखाली सामान्य लोकांचे जीवन धोक्यात घालणे. हे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय ठरू शकत नाही. कॉंकरोच जनता पार्टीच्या दिल्लीतील जंतर मंतर येथील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत सरकारने केलेल्या तयारीमध्ये शाळाची वर्ग ऑनलाईन घेणे. परीक्षा पुढे ढकलणे. मेट्रो स्थानकाचे प्रवेशद्वार आणि बाहेर पडण्याचे मार्ग बंद करणे. आणि रेल्वे गाड्या रद्द करणे. याचा समावेश असल्याने गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या संदर्भात एका आंदोलनासाठी मेट्रो स्थानिक बंद ठेवणे. आणि रेल्वे गाड्या रद्द करण्याचे निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने ही सरकारला कडक शब्दात फटकारले आहे.याचे कारण आहे एखादी गोष्ट रोखण्यासाठी आवश्यक तेवढीच कारवाई केली पाहिजे. असे न्यायालयाने म्हटले आहे. यातून सुरक्षा आणि नागरी स्वातंत्र यांच्यात संतुलन राखणे आवश्यक आहे.असा स्पष्ट संदेश प्रशासनाला जातो. आंदोलकांची मागणी मुख्य निवडणूक आयुक्त्याचा राजीनामा ही आहे. ते त्यांच्या मागण्याची सहमत आहेत की नाही हा वेगळा मुद्दा आहे परंतु त्यामुळे शांततापूर्ण आंदोलनाचा हक्क नाकारला जाऊ शकत नाही. त्याचप्रमाणे कायदा आणि सुव्यवस्था राखणे.आणि कोणत्याही अनुचित घटनेची शक्यता गांभीर्याने घेणे. ही प्रशासनाची जबाबदारी आहे. आंदोलनाशी काही संबंध नसलेल्या निरपराध नागरिकांना त्याची किंमत मोजावी लागते. तेव्हा समस्या निर्माण होते. दिल्लीतील शाळांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी ऑनलाईन वर्ग घेण्याच्या आणि इतर उपक्रम पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. महाविद्यालय परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. रेल्वेच्या ३८ गाड्या रद्द करण्यात आल्या. दिल्ली मेट्रोच्या ५७स्थानकांचे प्रवेश आणि निर्गमन दरवाजे बंद करण्याची विनंती करण्यात आली.या निर्णयाचा साहजिकच विद्यार्थी.पालक.नोकरदार व्यवसायिकांना व दिल्लीला प्रवास करणाऱ्या प्रवाशावर थेट परिणाम झाला. अनेकांसाठी प्रवास आवश्यक असला तरी विद्यार्थ्यांच्या परीक्षा आणि अभ्यासाला स्वतःचे महत्त्व आहे. किंवा सुरक्षा व्यवस्थेचा एक आवश्यक भाग म्हणून त्यांच्या समस्या कडे दुर्लक्ष करता येणार नाही.सरकार आंदोलनाची मूळ कारणे समजून न घेता केवळ बळाचा वापर करून आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न करते तेव्हा तणाव व संभ्रम आणखी वाढतो. परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते. आणि त्यातूनच हिंसेला आणि अतिरेकी प्रवृत्तींना खतपाणी मिळते.न्याय मागण्यासाठी शांततापूर्ण आंदोलन हे लोकशाहीचे भूषण आहे. परंतु आंदोलकांनी एकदा संयम सोडला की त्यांच्या मागण्याचे नैतिक बळ कमी होते. आणि त्यांना सहानुभूती गमवावी लागते. सरकारने संवाद टाळला आणि दडपशाहीचा मार्ग स्वीकारला की लोकांचा लोकशाही वरील विश्वास डळमळीत होतो. आणि कायदा सतत हातात घेण्याची घातक प्रवृत्ती वाढते. मतभेद हे लोकशाहीचे नैसर्गिक सौंदर्य आहे. परंतु मतभेदावर बोलण्याचे मार्ग बंद होतात तेव्हा ते समाजासाठी धोकादायक असतात. सार्वजनिक सुरक्षितता ही केवळ पोलिसांची जबाबदारी नसून सर्व नागरिकांची. आंदोलकांची. आणि सरकारची सामायिक जबाबदारी आहे. लोकशाहीत कोणताही पक्ष कायम परिपूर्ण नसतो. आणि कोणताही दृष्टिकोन अंतिम नसतो. नागरिकांनी आपले अधिकार समजून घेतले पाहिजेत. आणि त्यांच्यावरील येणारी सामाजिक जबाबदारीही समजून घेतली पाहिजे. आंदोलकांनी आपला आवाज स्पष्टपणे आणि निर्भीडपणे मांडला पाहिजे.पण शिस्तीने. विवेकाने सामान्य नागरिकांच्या हक्काचा आदर राखून केला पाहिजे.आणि सरकारने आपले अधिकार कायद्यानुसार वापरले पाहिजे. पण संवाद. पारदर्शकता. आणि उत्तरदायित्व यांना नेहमीच प्राधान्य दिले पाहिजे.राजकीय पक्ष व प्रशासन आपापली भूमिका समजून जबाबदारीने वागतात तेव्हाच लोकशाही खऱ्या अर्थाने बळकट आणि अर्थपूर्ण होते. आंदोलन हा लोकशाहीचा संघर्ष व्यक्त करण्याचा शेवटचा मार्ग नसावा. आणि दडपशाही हा सरकारचा पहिला प्रतिसादही नसावा. यातच लोकशाहीचे खरे यश आणि भविष्य घडलेले आहे.

NCDEX IPFT कडून पुणे येथे दोन दिवसाच्या

गुंतवणूकदार जागरूकता कार्यशाळेचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)



एनसीडीईएक्सने आपल्या इन्वेस्टर प्रोटेक्शन फंड ट्रस्ट (IPFT) अंतर्गत, इंटरनॅशनल ऑर्गनायजेशन ऑफ सेक्यूरिटीज कमिशन (IOSCO) च्या जागतिक गुंतवणूकदार आठवडा (World Investor Week) २०२६ च्या निमित्ताने पुणे येथे ६ आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी दोन दिवसांच्या गुंतवणूकदार जागरूकता कार्यशाळेचे आयोजन केले. या सत्रांमध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींना डिजिटल फसवणूक (scams), अफवा आणि निश्चित परताव्याच्या आश्वासने यांची ओळख कशी करावी, तसेच सुरक्षित गुंतवणुकीसाठी काय करावे आणि काय करू नये याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेत महाराष्ट्रातील कमोडिटी व्यापाराचे व्यावहारिक उदाहरण देत नियमनबद्ध आणि पारदर्शक बाजारपेठ कशा प्रकारे कार्य करते, हेही समजावून सांगण्यात आले.

जागतिक गुंतवणूकदार आठवडा हा इंटरनॅशनल ऑर्गनायजेशन ऑफ सेक्यूरिटीज कमिशन (IOSCO) च्या नेतृत्वाखाली राबविला जाणारा जागतिक उपक्रम असून, त्याचा उद्देश गुंतवणूकदारांचे शिक्षण आणि संरक्षण यांना प्रोत्साहन देणे हा आहे. गुंतवणूकदारांची जोखीम-सहनक्षमता (Investor Resilience), डिजिटल फसवणूक (Digital Deception) आणि फसवणुकीपासून सावधानता (Scam Alert) हे यावर्षीचे प्रमुख विषय आहेत. जागतिक गुंतवणूकदार आठवडा २०२६ च्या निमित्ताने एनसीडीईएक्स आयपीएफटीने स्वतःच्या पुढाकारातून या कार्यशाळेचे आयोजन केले.

कार्यशाळेच्या उद्देशाविषयी बोलताना एनसीडीईएक्सचे मुख्य व्यवसाय अधिकारी श्री. केदार देशपांडे म्हणाले, "गुंतवणूकदारांचे संरक्षण जागरूकतेपासून सुरू होते. नियमनबद्ध बाजारपेठांमधील सहभाग सातत्याने वाढत असताना, गुंतवणूकदारांनी पूर्ण माहिती घेणे, योग्य प्रश्न विचारणे आणि ऐकायला खूपच आकर्षक किंवा अवास्तव वाटणाऱ्या ऑफर्सपासून दूर राहणे आवश्यक आहे. व्यवहारातील समोरच्या पक्षाची पडताळणी करणे, करारपत्र (Contract Note) प्राप्त करणे आणि निश्चित परताव्याच्या योजनांपासून दूर राहणे ही बचत सुरक्षित करण्यासाठीची सोपी आणि प्रभावी पावले आहेत. जागतिक गुंतवणूकदार आठवडयाच्या निमित्ताने ही चर्चा घडवून आणताना, गुंतवणूकदार आणि शेतकरी यांच्यातील जागरूकता अधिक बळकट करणे हा आमचा उद्देश आहे, ज्यामुळे ते अधिक आत्मविश्वासाने आणि सुरक्षिततेने बाजारपेठांमध्ये सहभागी होऊ शकतील."

फसवणुकी या निश्चित परताव्याचे आश्वासन देतात; परंतु बाजारपेठा ते कधीही देऊ शकत नाहीत. निश्चित परतावा, महत्वाच्या टिप्स आणि अफवा— यामध्ये सोशल मीडिया आणि मेसेजिंग ॲप्सद्वारे येणाऱ्या फसवणुकीच्या धोक्याचे ठळक संकेत आहेत. श्वास ठेवण्यापूर्वी पडताळणी करा. केवळ एक्सचेंजमध्ये नोंदणीकृत असलेल्या सदस्यांमार्फतच व्यवहार करा. अशा सदस्यांची यादी एक्सचेंजच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. अनधिकृत मध्यस्थांमार्फत किंवा बाजाराबाहेर (ऑफ-मार्केट) व्यवहार केल्यास गुंतवणूकदारांना एक्सचेंजच्या संरक्षणाचा लाभ मिळत नाही.

कागदपत्रांची कार्यवाही म्हणजे संरक्षण. प्रत्येक व्यवहारासाठी स्वाक्षरी केलेले करारपत्र (Contract Note), जोखीम प्रकटीकरण निवेदन (Risk Disclosure Statement) आणि खात्याच्या विवरणपत्रांची नियमित तपासणी केल्यास विसंगती लवकर लक्षात येण्यास मदत होते आणि केलेल्या व्यवहारांची पडताळणी एक्सचेंजच्या वेबसाइटवरही करता येते. जोखीम व्यवस्थापन केवळ वैयक्तिक गुंतवणूकदारांसाठी नाही. जगभरातील व्यावसाईक संस्था आणि सरकारेदेखील किंमतीच्या चढ-उतारांमुळे होणाऱ्या महागड्या परिणामांपासून संरक्षण करण्यासाठी या साधनांचा वापर करतात.

जागरूकता हेच सर्वोत्तम संरक्षण आहे. बाजारपेठ कशी कार्य करते याची माहिती असल्यास दिशाभूल करणारे दावे नुकसान करण्यापूर्वीच ओळखणे अधिक सोपे होते.

केवळ एक्सचेंजमध्ये नोंदणीकृत सदस्यांमार्फतच व्यवहार करा आणि त्यांची नोंदणी एक्सचेंजच्या वेबसाइटवर तपासून घ्या. प्रत्येक व्यवहारासाठी स्वाक्षरी केलेले करारपत्र (Contract Note) आणि जोखीम प्रकटीकरण निवेदन (Risk Disclosure Statement) घेण्याचा आग्रह धरा. आपल्या खात्याच्या विवरणपत्रांचा नियमित ताळमेळ करून घ्या आणि कोणतीही विसंगती आढळल्यास ती त्वरित निदर्शनास आणून द्या.

पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षलागवड व पशुपक्ष्यांचे संरक्षण आवश्यक - रमेश खरमाळे



■ नारायणगाव (दै. संध्या)

"जागतिक तापमानवाढीमुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत चालले आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी वृक्षलागवड करून झाडांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. तसेच पशुपक्षी मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असल्याने त्यांचे संरक्षण केले पाहिजे. गुरुवर्य नानासाहेबांनी या माळरानावर अनेक झाडे लावून त्यांचे संवर्धन केले," असे प्रतिपादन वनरक्षक रमेश खरमाळे यांनी केले.

गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, नारायणगाव येथे माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने 'पर्यावरणाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानातून खरमाळे यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले.या वेळी माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य रत्नाकर सुबंध, सूर्यकांत गांधी, चंद्रशेखर भागवत, महेश शिंदे, राजेश रत्नपारखी, दीपक वारुळे, वडगाव कांदळीचे उपसरपंच संजय खेडकर, मुख्याध्यापिका मानसी भालेराव, पर्यवेक्षक सुनील ढवळे, व्यावसायिक विभाग प्रमुख डॉ.सत्यवान थोरात, विज्ञान विभाग प्रमुख नितीन पोखरकर , वाणिज्य विभाग प्रमुख अरुण हिंगे, माजी विद्यार्थी संघाचे समन्वयक संतोष देशपांडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य संजय वलटे यांनी केले. रत्नाकर सुबंध यांनी गुरुवर्य नानासाहेब यांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त केले.

वाघिरे महाविद्यालयात नवमतदार नोंदणी अभियान उत्साहात

■ यवत (दै. संध्या)

नारायणगाव : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओतूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नवमतदार नोंदणी अभियान यशस्वीरीत्या राबविण्यात आले. अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. राजेंद्र आंबवणे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. राजेंद्र आंबवणे यांनी केले. त्यांनी आपल्या मनोगतात मतदार हा लोकशाहीचा आत्मा असून प्रत्येक नागरिकाने आपल्या मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व जाणून घेतले पाहिजे, असे सांगितले. योग्य व्यक्तीला मतदान केल्यामुळे देशाच्या विकासाला हातभार लागतो. पात्र विद्यार्थ्यांनी मतदार यादीमध्ये आपल्या नावाची नोंदणी करून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी ओतूर येथील महसूल विभागाचे मंडल अधिकारी श्री. व्ही. एम. शिंदे, तसेच सुपे ए. टी. (ग्राम महसूल अधिकारी) आणि राऊत एस. एस. (महसूल सेवक) उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना नवमतदार नोंदणीसाठी आवश्यक असलेली प्रक्रिया, अर्ज भरण्याची पद्धत आणि मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. तसेच पात्र विद्यार्थ्यांनी मतदार यादीमध्ये आपले नाव नोंदवून मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी देशाच्या हितासाठी आणि विकासासाठी मतदान करणे आवश्यक असल्याचे सांगितले. मतदार हा लोकशाहीचा आधारस्तंभ असून प्रत्येक पात्र नागरिकाने निवडणुकीत आपल्या मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे.जागरूक मतदारांमुळे लोकशाही अधिक बळकट होते, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनायक कुंडलिक यांनी केले, तर राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक अर्णव बेनके यांनी आभार प्रदर्शन केले. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण करून लोकशाहीच्या बळकटीकरणाचा संदेश देण्यात आला.

सोमेश्वर कारखान्याच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात लक्ष्मी दर्शन झाल्याने पराभव: जगताप

■ सोमेश्वरनगर(दै. संध्या)



सुनेत्रा पवार यांच्या पासून बाजूला जात बंडखोरी करून पुरुषोत्तम जगताप यांनी भाजप चे पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप यांना बरोबर घेत 21 जणांना बरोबर घेत स्वतंत्र पॅनल उभा करून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना आव्हान उभा केलं होतं.

मात्र पुरुषोत्तम जगताप यांच्यासह सर्व उमेदवारांचा सोमेश्वर च्या मतदारांनी दारुण पराभव केला आहे.उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पॅनलच्या वतीने मोठ्या प्रमाणात लक्ष्मी दर्शन झाल्यानेच आमच्या पॅनलच्या उमेदवारांचा पराभव झाला असल्याचा आरोप पुरुषोत्तम जगताप यांनी केला आहे.

जिल्हा परिषद शाळेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

■ शिरूर (दै. संध्या)

शिक्षणाचा मुख्य आधार असलेल्या जिल्हा परिषद शाळेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना निमोणे येथील ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे. निमोणे येथील जिल्हा परिषद शाळेत पदवीधर शिक्षकांच्या दोन पदे रिक्त असल्याची माहिती असून, जून महिन्यापासून शिक्षकांची कमतरता जाणवत असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत चिंता व्यक्त होत आहे.

श्री बिरोबा महाराज पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न

■ वडगाव कांदळी (दै. संध्या)



श्री बिरोबा महाराज ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था , वडगांव (कांदळी) ता.जुन्नर जि.पुणे या पतसंस्थेला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ४० लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असून सभासदांना १४ टक्के लाभांश व दिवाळी भेटवस्तू देण्याचा संस्थेचा मनोदय आहे, अशी माहिती चेअरमन सचिन निलख यांनी दिली.

वडगांव (कांदळी) येथील ग्रामपंचायतीच्या नवीन सभागृहामध्ये संस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन सचिन निलख यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना सर्वसंमतीने मान्यता देण्यात आली . यावेळी बोलताना त्यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, योजना, भविष्यातील नियोजन याबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ सभासद डॉ.सत्यवान थोरात यांनी संस्थेस ऑडिट वर्ग'अ'मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करून उपस्थित सभासदांना मोलाचे मार्गदर्शन केले.

पतसंस्थेकडे १७ कोटी रुपयांच्या ठेवी असून संस्थेने १२ कोटी ३० लाख रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. खेळते भागभांडवल २१ कोटी ७४ लाख रुपये आहे. संस्थेचे वसूल भागभांडवल 1 कोटी 46 लाख रुपये असून राखीव निधी 2 कोटी 21 लाख रुपयांचा आहे. या आर्थिक वर्षात संस्थेला 2 कोटी 21 लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. पुढील आर्थिक वर्षात संस्थेने २० कोटी ठेवींचा टप्पा पार करण्याचे उद्दीष्ट समोर ठेवले आहे.

संस्थेचे व्हा. चेअरमन देविदास भोर यांनी प्रास्ताविक केले. सभेचे सूत्रसंचालन अंतर्गत हिशोब तपासणीस बबन भालेराव यांनी केले. संस्थेचे संचालक पंढरीनाथ पाचपुते यांनी उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानले. याप्रसंगी संचालक ज्ञानेश्वर थोरात, पंढरीनाथ पाचपुते, चंद्रकांत पाचपुते, डॉ.निजाम पठाण, संतोष लांडगे, अविनाश पवार, रवींद्र रोकडे, अंजना नरवडे, मनिषा सोनवणे, तज्ञ संचालक संभाजी पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी नंदकुमार मुटके, संगणक ऑपरेटर अजित रोकडे, अंतर्गत हिशोब तपासणीस बबन भालेराव आणि मदतीस रमेश पाचपुते उपस्थित होते. याप्रसंगी बिरोबा महाराज देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त बाबाजी लांडगे, सचिव बबन पाचपुते, गावचे माजी उपसरपंच विठ्ठल पाचपुते, माजी सनदी अधिकारी शंकर पाचपुते यांनी चर्चेत सहभाग घेतला. सेवानिवृत्त बँक अधिकारी रामकृष्ण पाचपुते, वडगाव (कांदळी) विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन नितीन पवार, माजी आदर्श सरपंच ज्ञानेश्वर निलख, शिवसेनेच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा शोभा पाचपुते या मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले व संस्थेला भावी काळासाठी शुभेच्छा दिल्या. या आर्थिक वर्षात संस्थेला ऑडिट वर्ग 'अ' मिळाल्यामुळे सभासद उपस्थित होते.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

श्रीसूक्त पठणातून पुणेकरांनी केली श्री महालक्ष्मी देवीची स्तुती

श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग तर्फे आयोजित सार्वजनिक नवरात्रोत्सव ; श्रीसूक्त व अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ पुणे (दै. संध्या)

माता माता की जय... चा नामघोष, शंख वादनाचा निनाद आणि ओम हिरण्यवर्णां हरिणीं सुवर्णरजतस्त्रजाम्, चंद्रा हिरण्यमीं लक्ष्मीं जातवेदो म आवह... च्या स्वरांनी श्री महालक्ष्मी मंदिराचा परिसर दुमदुमून गेला. नवरात्र उत्सवातील द्वितीयेची पहाट शेकडो महिला व पुरुषांनी सामुहिकरित्या केलेल्या श्रीसूक्त आणि श्री गणपती अथर्वशीर्ष पठणाद्वारे मंगलमय झाली.

निमित्त होते, श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग च्यावतीने आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सवात झालेल्या सामूहिक श्रीसूक्त पठण कार्यक्रमाचे. यावेळी डॉ. सतिश देसाई, मंदिराच्या प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त डॉ. तृप्ती अग्रवाल, भरत अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर यांसह विश्वस्त व पदाधिकारी उपस्थित होते. ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमास पारंपरिक वेशात उपस्थित महिलांनी जय माता दी... च्या जयघोष करीत आसमंत दणाणून सोडला. पठणाची सुरुवात शंखनाद पथकातील वादकांच्या शंखवादनाने झाली. श्रीसूक्त म्हणजे काय? त्याचे महत्व आणि महती याविषयी देखील उपस्थितांना माहिती देण्यात आली. त्यानंतर ओंकार, अथर्वशीर्षाचा एक पाठ आणि श्री सूक्ताचे तीन पाठ असे सामुदायिकरित्या पठण करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता आरतीने झाली.विश्वस्त डॉ. तृप्ती अग्रवाल म्हणाल्या, सामुहिक श्रीसूक्त पठणाच्या माध्यमातून महिला शक्तीने एकत्र येऊन स्त्री शक्तीचा जागर करावा, हा उद्देश दरवर्षी असतो. नवरात्रोत्सवाच्या पवित्र पर्वात श्री महालक्ष्मी देवीची आराधना, भक्तिभाव आणि आध्यात्मिक वातावरणाची अनुभूती देणाऱ्या या सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविक सहभागी होतात. त्या पुढे म्हणाल्या, श्रीसूक्त हे ऋग्वेदातील श्री महालक्ष्मी देवीच्या स्तुतीस समर्पित पवित्र वैदिक स्तोत्र आहे. सुख, समृद्धी, ऐश्वर्य, शांती आणि कल्याण यांचे प्रतीक असलेल्या देवी महालक्ष्मीच्या उपासनेत श्रीसूक्त पठणाला विशेष महत्त्व आहे. सामूहिक पठणातून भक्ती, सकारात्मक ऊर्जा आणि सामूहिक मंगलभावनेचा संदेश देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.



थोडक्यात पण महत्वाचे



पवना नदी स्वच्छता मोहिमेत ३०० कॅडेट्सचा सहभाग; अडीच टन कचरा संकलित

पुणे : दैनिक संध्या

नदीप्रदूषण रोखून जलस्रोतांचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने आणि इंडियन मेरिटाइम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रावेत येथील वाल्हेकरवाडी परिसरात पवना नदी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेत सुमारे ३०० कॅडेट्स आणि त्यांच्या पालकांनी सहभाग घेतला. नदीकाठावरून सुमारे अडीच टन कचरा संकलित करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ पुणे सेंट्रल, इंडियन मेरिटाइम फाउंडेशन आणि सी स्काउट्स अँड गाइड्सतर्फे सलग २० व्या वर्षी या मोहिमेचे आयोजन करण्यात आले. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रोटेरियन नितीन धमाले यांच्या हस्ते मोहिमेचे उद्घाटन झाले. रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष रोटेरियन संजय करवा यांनी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर आणि उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. रोटरी क्लब ऑफ पुणे सेंट्रलचे अध्यक्ष कमोडोर परवीन मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखाली आणि सी स्काउट्स अँड गाइड्सचे संस्थापक व कमांडंट कॅप्टन डॉ. गोपी शेट्टी यांच्या समन्वयातून ही मोहीम पार पडली. रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष रोटेरियन अजय दुबे यांनी संपूर्ण उपक्रमासाठी आर्थिक सहकार्य केले. नद्यांचे संवर्धन केल्याने समुद्र आणि महासागरांचे प्रदूषण रोखण्यास मदत होते, असे कमोडोर परवीन मल्होत्रा यांनी सांगितले. मोहिमे दरम्यान कॅडेट्सनी नदीत कचरा टाकू नये, जलप्रदूषण रोखावे आणि पाण्याचे संवर्धन करावे, याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती केली. सहभागी नागरिकांनी जलस्रोतांचे संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनासाठी योगदान देण्याचा संकल्प केला. या उपक्रमाला कमोडोर (निवृत्त) अजय चितणीस, कॅप्टन मुकुंद येवलेकर (निवृत्त), उपकमांडंट जी. सी. बेहेरा, रोटेरियन यज्दी बाटलीवाला, गौरी शेट्टी, रोटेरियन अमित औटी आणि स्थानिक महापालिका विभागीय कार्यालयाचे सहाय्यक आरोग्य अधिकारी शांताराम माने यांच्यासह मान्यवर, पालक आणि नागरिक उपस्थित होते. 'नद्या स्वच्छ ठेवा, महासागर वाचवा आणि पर्यावरणाचे रक्षण करा' हा' संदेश देणाऱ्या या मोहिमेतून युवकांचा पर्यावरण संवर्धनातील सहभाग आणि सामूहिक सामाजिक जबाबदारी अधोरेखित झाली.

डॉ. कल्याण गंगवाल यांना 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान

पुणे : दैनिक संध्या

समाजसेवा, जैन संस्कृतीचा प्रसार, अहिंसा, जीवदया, शाकाहार आणि व्यसनमुक्तीच्या कार्यासाठी समर्पित असलेल्या डॉ. कल्याण गंगवाल यांना 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. आंतरराष्ट्रीय भक्तामर दिवस २०२६ च्या निमित्ताने पुण्यातील पंडित फार्म येथे नुकताच हा सन्मान सोहळा पार पडला. सकल दिगंबर जैन समाज, पुणे आणि पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. डॉ. कल्याण गंगवाल यांनी वयाच्या ८२ व्या वर्षापर्यंत १३० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त केले आहेत. त्यांच्या दीर्घकालीन सामाजिक आणि सेवाभावी कार्याची दखल घेत त्यांना हा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कारावर 'जैन धर्म आणि संस्कृतीच्या भावनेत आपल्या अनुकरणीय योगदानाबद्दल' असा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला आहे. या सोहळ्याला पूज्य आचार्य प्रणाम सागरजी यांचे मंगल सान्निध्य आणि आशीर्वचन लाभले. तसेच सकल दिगंबर जैन समाज, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुनावळे येथील २९ दिगंबर जैन मंदिरांच्या ट्रस्टींच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. गंगवाल यांनी या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. उर्वरित आयुष्यही प्रभूच्या चरणी समर्पित करून अहिंसा, जीवदया, शाकाहार आणि व्यसनमुक्तीचा संदेश समाजात रुजविण्याचे कार्य सुरू ठेवण्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

अर्जुन आणि दुर्योधन साकारणार माता दुर्गा आणि महिषासुर यांच्यातील आयकॉनिक युद्ध



पुणे : दैनिक संध्या

सोनी सबची 'हस्तिनापूर के वीर' मालिका पांडव आणि कौरवांच्या बालपणीच्या कथा जिवंत करते, ज्यामध्ये शौर्य, कर्तव्य आणि वाईटावर चांगल्याच्या विजयाची मूल्ये अधोरेखित केली जातात. मालिकेतील एका विशेष नृत्य सादरीकरणात अर्जुन (उर्वा सावलिया) माता दुर्गेची भूमिका साकारणार आहे, तर दुर्योधन (आयुध भानुशाली) महिषासुराची भूमिका साकारत दैवी देवी आणि राक्षस यांच्यातील आयकॉनिक संघर्ष पुन्हा जिवंत करणार आहे. या सादरीकरणामध्ये नृत्य, संगीत आणि प्रभावी हावभावांचा संगम साधत या दंतकथेतल्या युद्धाची तीव्रता जिवंत केली जाते. माता दुर्गेच्या वेशात उर्वा एका वेगळ्या रूपात दिसणार असून, आपल्या सादरीकरणातून तो सौंदर्य आणि सामर्थ्य यांचा सुंदर मिलाफ साकारतो. दुसरीकडे, दुर्योधन महिषासुराच्या पराक्रमाचे प्रभावी चित्रण करतो. हा सीन उर्वासाठी एक नवा अनुभवही ठरला आहे, कारण या सादरीकरणासाठी नृत्याच्या हालचाली आणि हावभाव परिपूर्ण करण्यासाठी त्याने अनेक आठवडे दररोज सराव केला. अर्जुनची भूमिका साकारणारा उर्वा सावलिया म्हणाला, "या विशेष सादरीकरणात मला माता दुर्गेची भूमिका साकारायची आहे हे समजल्यावर काहीतरी पूर्णपणे नवीन करण्याची संधी मिळाल्याने मी खूप उत्साहित झालो होतो. माता दुर्गेचा वेश परिधान करून त्या भूमिकेत शिरणे हा माझ्यासाठी एक वेगळाच अनुभव होता. या सादरीकरणासाठी नृत्याच्या हालचाली आणि हावभाव अचूकपणे साकारण्यासाठी मला अनेक आठवडे सराव करावा लागला, जेणेकरून अशा आयकॉनिक भूमिकेला योग्य न्याय देता येईल. हा प्रवास आव्हानात्मक असतानाच तितकाच आनंददायीही होता, कारण यामुळे मला स्वतःमधील एक वेगळी बाजू शोधता आली. इतक्या खास गोष्टीचा भाग होण्याची संधी मिळणे खरोखरच अद्भुत होते."'हस्तिनापूर के वीर' पाहायला विसरू नका, सोमवार ते शनिवार रात्री 9:00 वाजता, फक्त सोनी सबवर.

अनुराधा ओक, प्रियांका इंगळे यांना 'तेजस्विनी' पुरस्कार'

■ पुणे (दै. संध्या)



महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या २८ व्या पुणे नवरात्रौ महिला महोत्सवाचे उद्घाटन मंत्री उदय सामंत यांच्या पत्नी, अभिनेत्री व दिग्दर्शिका नीलम शिर्के-सामंत यांच्या हस्ते सोमवारी (ता. १२) शिवदर्शन येथील श्री लक्ष्मीमाता मंदिर प्रांगणात झाले. यावेळी बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक आणि भारतीय महिला खो-खो संघाची कर्णधार प्रियांका इंगळे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'तेजस्विनी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर युवा कलाकारांनी 'आई गिरीनंदिनी' या देवीगीतावर नृत्य सादर केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. हा महोत्सव १२ ते १८ ऑक्टोबरदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. यंदा बालभारती संस्थेच्या स्थापनेचे ६० वे वर्ष सुरू असून, संस्थेच्या संचालिका अनुराधा ओक यांनी शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्कार स्वीकारला. तसेच पहिल्या महिला खो-खो विश्वचषक स्पर्धेत विजेतेपद मिळवणाऱ्या भारतीय महिला संघाची कर्णधार प्रियांका इंगळे हिचाही गौरव करण्यात आला.

हिंदु जनजागृती समितीचे रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण

पुणे येथे घेतली 'हिंदु राष्ट्र-स्थापने'ची प्रतिज्ञा !

■ पुणे(दै. संध्या)



घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर हिंदु जनजागृती समितीने २४ वर्षे पूर्ण करून २५ व्या (रौप्य महोत्सवी) वर्षात पदार्पण केले आहे. हिंदु राष्ट्र स्थापनेच्या ध्येयाने प्रेरित होऊन कार्यरत असलेल्या समितीच्या वतीने या रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने देशभरात विशेष उपक्रम राबवण्यात येत आहेत. ज्याप्रमाणे छत्रपती शिवरायांनी रायरेश्वराच्या मंदिरात 'हिंदवी स्वराज्या'ची प्रतिज्ञा घेतली होती, त्याच प्रेरणादायी धर्तीवर पुणे येथे चतुःश्रृंगी मंदिर येथे आणि श्री तुकाई माता मंदिर, पारगाव (सा.मा.) येथे श्री तुकाई मातेच्या चरणी हिंदुत्वनिष्ठ, धर्मप्रेमी आणि समाजबांधवांनी संघटित होऊन 'हिंदु राष्ट्र-स्थापने'ची ऐतिहासिक प्रतिज्ञा घेतली. यावेळी भगवान श्रीकृष्णाच्या चरणी प्रार्थना करून भारत देशाला पुन्हा 'धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्र' अर्थात् रामराज्य बनवण्यासाठी आयुष्य समर्पित करण्याचा दृढ निर्धार करण्यात आला. या प्रतिज्ञेद्वारे सनातन हिंदु धर्मावर अढळ श्रद्धा ठेवणे, हिंदु संस्कृतीचे संवर्धन करणे, तसेच देवळे, गोमाता आणि स्त्रियांचे प्राणपणाने रक्षण करण्याची शपथ घेण्यात आली. यासह आक्रमकांनी नष्ट केलेल्या मंदिरांचा जीर्णोद्धार करण्यासाठी आणि छत्रपती शिवरायांप्रमाणे 'शक्तीची उपासना' करून हिंदु राष्ट्रासाठी तन-मन-धनाचा त्याग करण्यासाठी सर्वांनी कटिबद्धता दर्शवली. "आता एकच लक्ष्य, एकच ध्येय, हिंदु राष्ट्र ! जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।" या निनादाने या वेळी हिंदु राष्ट्राचा जागर करण्यात आला.



श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग च्या वतीने आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सवात 'देवी वंदना' सादर करण्यात आली. यावेळी कलाकारांनी नृत्यातून देवीची आराधना केली. तसेच श्री महाकाली, श्री महालक्ष्मी आणि श्री महासरस्वती या आदिशक्तीच्या त्रिदेवी स्वरूपातील लीलांचे विविध पैलू नृत्याद्वारे उपस्थितांसमोर उलगडण्यात आले.

ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या निधनावर आमदार गोरखे यांची शोकसंवेदना

■ पुणे (दै. संध्या)



मराठी चित्रपटसृष्टीवर पुन्हा एकदा शोककळा पसरली असून, ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाचे दुःख ताजे असतानाच, आता मराठीतील लाडक्या आणि अष्टपैलू अभिनेत्री मधु कांबीकर यांच्या निधनाची अत्यंत दुःखद बातमी समोर आली आहे. एकापाठोपाठ एक जवळची जिव्हाळ्याची माणसं निरोप घेत असल्यामुळे मन सुन्न झाले आहे, अशा शब्दांत आमदार अमित गोरखे यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत.

ज्येष्ठ अभिनेत्री मधु कांबीकर यांच्या आठवणींना उजाळा देताना आमदार अमित गोरखे म्हणाले, २०१३ मधील तो दिवस आजही डोळ्यांसमोर अगदी स्पष्ट उभा आहे, जेव्हा त्यांच्याशी कलारंग संस्थेच्या कार्यक्रमात प्रत्यक्ष भेट झाली होती. एका मोठ्या प्रतिभेची कलाकार असूनही त्यांच्या वागण्यातली साधी, मनमिळाऊ स्वभाव, माणुसकी, चेहऱ्यावरचे ते प्रेमळ हास्य आणि आपुलकीने चौकशी करण्याची त्यांची सवय आजही मनाच्या एका कोपऱ्यात घर करून आहे. त्या केवळ पडद्यावरच्या अभिनेत्री नव्हत्या; अनेक चित्रपटांमध्ये 'लक्ष्या'च्या आईच्या भूमिका असोत.

पुणे लोकमान्य फेस्टिव्हलचे दिमाखात उद्घाटन, १२ ते २५ ऑक्टोबरदरम्यान मेजवानी

■ पुणे (दै. संध्या)

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून शिवगर्जना प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पुणे लोकमान्य फेस्टिव्हल – नवरात्र उत्सव २०२६'चे लोकमान्यनगर, जॉगिंग पार्कजवळ, नवी पेठ येथे दिमाखात उद्घाटन झाले. यावेळी देवीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. शौर्य ढोल-ताशा पथकाच्या वादनाने उद्घाटन सोहळ्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यंदा या महोत्सवाचे २९ वे वर्ष असून, परंपरा आणि आधुनिकतेचा सुरेख संगम साधत पुणेकरांसाठी विविध सांस्कृतिक, धार्मिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांची मेजवानी आयोजित करण्यात आली आहे. महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. गणेश सातपुते, निमंत्रक शुभांगी सातपुते आणि उत्सव अध्यक्ष डॉ. नरेश मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव साजरा होत आहे. महोत्सवांतर्गत १२ ऑक्टोबर रोजी 'साई दरबार', १३ ऑक्टोबर रोजी 'पाहणं तुम्ही म्हणाल तसं' हा लावणी कार्यक्रम, १४ ऑक्टोबर रोजी 'गीतों का सफर', तर १५ ऑक्टोबर रोजी लोकप्रिय 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १६ ऑक्टोबर रोजी महाकाली तांडव नृत्याचा लाईव्ह शो, १७ ऑक्टोबर रोजी महिलांसाठी 'रास रिदम गरबा नाईट', १८ ऑक्टोबर रोजी ग्रुप डान्स आणि सोलो डान्स स्पर्धा, तर १९ ऑक्टोबर रोजी दांडिया कार्यक्रम रंगणार आहे. २० ऑक्टोबर रोजी दसऱ्यानिमित्त रावणदहनाचा कार्यक्रम होणार असून, २५ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त 'टेंशन खल्लास' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सर्व कार्यक्रम नागरिकांसाठी विनामूल्य या महोत्सवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे सर्व कार्यक्रम नागरिकांसाठी विनामूल्य खुले ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे पुणेकरांना कुटुंबीयांसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेता येणार आहे.



जयपूर रग्सच्या वार्षिक विशेष सेल

२०२६ मध्ये ६०% पर्यंत सूट

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

हाताने विणलेल्या रग्स आणि कार्पेट्ससाठी प्रसिद्ध असलेल्या जयपूर रग्सने आपल्या वार्षिक विशेष सेल २०२६ ची घोषणा केली आहे. या सेलमध्ये ग्राहकांना विविध डिझाइन्स, कलाकुसर आणि विणकामाच्या तंत्रांचा समावेश असलेल्या रग्सवर ६०% पर्यंत सूट मिळणार आहे. याशिवाय, या उपक्रमातून मिळणाऱ्या उत्पन्नातील काही भाग ग्रामीण मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सायकल निधीला दिला जाणार आहे. यंदाच्या सेलच्या माध्यमातून जयपूर रग्सने खरेदीच्या अनुभवाला सामाजिक उद्देशाची जोड दिली आहे. ग्रामीण भागातील अनेक मुलींना शाळेत जाण्यासाठी लांबचे अंतर पायी पार करावे लागते. अशा मुलींसाठी सायकल हे केवळ वाहतुकीचे साधन नसून, वेळ वाचवण्यास, प्रवासातील अडचणी कमी करण्यास आणि शिक्षण सुरू ठेवण्यास मदत करणारे महत्त्वाचे साधन ठरू शकते. जयपूर रग्सचे व्यवस्थापकीय संचालक योगेश चौधरी म्हणाले, "अनेकदा साध्या गोष्टींमधूनही अर्थपूर्ण बदल घडू शकतो. शहरांमध्ये आपण अनेक सुविधांचा सहज वापर करतो; मात्र ग्रामीण भारतातील अनेक मुलींसाठी सायकलचा अभाव हा शिक्षणाच्या मार्गातील मोठा अडथळा ठरू शकतो. एखाद्या मुलीच्या प्रवासातील हा अडथळा दूर करण्यासाठी आपण थोडीशी मदत करू शकलो, तर गालिच्याची खरेदीदेखील एका मोठ्या सामाजिक बदलाचा भाग बनू शकते. व्यवसायाने केवळ आपल्या घरांना आणि राहण्याच्या जागांना सुंदर बनवण्यापुरते मर्यादित न राहता, समाजातील लोकांच्या जीवनातही सकारात्मक मूल्य निर्माण केले पाहिजे, असा आमचा विश्वास आहे." या उपक्रमाद्वारे जयपूर रग्सने दैनंदिन वापरातील गालिच्यांच्या खरेदीला ग्रामीण मुलींसाठी शिक्षणाच्या अधिक संधी निर्माण करण्याच्या उद्देशाशी जोडले आहे. ग्रामीण समुदायांसोबतचे दीर्घकालीन संबंध, हस्तकलेला प्रोत्साहन आणि रोजगाराच्या माध्यमातून जीवनमान उंचावण्याचा ब्रँडचा दृष्टिकोन या उपक्रमातून अधोरेखित होतो.



■ ग्रामीण मुलींच्या शिक्षणासाठी सायकल निधीला मदत

■ कारागिरी आणि डिझाइनचा अनोखा संगम

■ सेलमधून मिळणाऱ्या उत्पन्नातील काही भाग ग्रामीण मुलींसाठी सायकल निधीला दिला जाणार

सेफएक्सप्रेसकडून महाराष्ट्रातील नागपूर येथे

अत्याधुनिक लॉजिस्टिक्स पार्कचे उद्घाटन

नवीन सुविधा महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला गती देणार

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील आघाडीची सप्लाय चेन आणि लॉजिस्टिक्स कंपनी सेफएक्सप्रेसने महाराष्ट्रातील नागपूर येथे आपल्या अत्याधुनिक लॉजिस्टिक्स पार्कचे उद्घाटन केले आहे. अमरावती रोडजवळ, राष्ट्रीय महामार्ग, (एनएच-53), धामना, नागपूर येथे मोक्याच्या ठिकाणी उभारण्यात आलेली ही नवीन सुविधा म्हणजे या प्रदेशातील लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. उद्घाटन समारंभाला सेफएक्सप्रेसचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. 11 लाख चौरस फूट क्षेत्रफळावर विस्तारलेला नागपूर लॉजिस्टिक्स पार्क अत्याधुनिक ट्रान्सशिपमेंट आणि थर्ड-पार्टी लॉजिस्टिक्स (3PL) सुविधांनी सुसज्ज आहे. या सुविधेची रचना परिसरातील व्यवसायांच्या वाढत्या गोदाम आणि वितरणविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी करण्यात आली आहे. यामुळे पुरवठा साखळीचे कामकाज अधिक वेगवान, कार्यक्षम आणि विश्वासार्ह होण्यास मदत होईल. या आधुनिक क्रॉस-डॉकिंग सुविधेमध्ये एकाच वेळी 261 हून अधिक वाहनांमधील मालाची चढ-उतार प्रक्रिया करता येते. यामुळे कामकाजाची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढेल. या सुविधेमध्ये 105 फुटांपेक्षा अधिक रुंदीचा स्तंभविरहित मोकळा विस्तार उपलब्ध आहे, ज्यामुळे मालाची वाहतूक सुरळीतपणे करता येते. तसेच, 16 फूट रुंदीचे कॅन्टिलिव्हर शेड्स सर्व हवामान परिस्थितींमध्ये मालाची चढ-उतार प्रक्रिया अखंडपणे सुरू ठेवण्यास मदत करतात.

नागपूर हे महाराष्ट्रातील एक प्रमुख औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून उदयास येत आहे. भारताच्या मध्यवर्ती भागात असलेल्या या शहराला रस्ते, रेल्वे आणि हवाई मार्गांद्वारे उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी लाभली आहे. ऑटोमोटिव्ह, अभियांत्रिकी, उत्पादन, वस्त्रोद्योग, अन्नप्रक्रिया, खाणकाम, ऊर्जा आणि औषधनिर्मिती अशा विविध उद्योगांचे नागपूरमध्ये मजबूत औद्योगिक जाळे आहे. बुटीबोरी आणि हिंगणा यांसारखी औद्योगिक क्षेत्रे उत्पादन आणि व्यावसायिक विकासाला चालना देतात, तर मिहान (MIHAN) प्रकल्पामुळे शहराच्या लॉजिस्टिक्स आणि पायाभूत सुविधांशी संबंधित क्षमतांना आणखी बळ मिळत आहे. नागपूरचे मध्यवर्ती भौगोलिक स्थान, विस्तारणारे गोदामांचे जाळे आणि विकसित होत असलेले औद्योगिक कॉरिडॉर यामुळे लॉजिस्टिक्स आणि पुरवठा साखळी सेवांसाठी मोठ्या संधी निर्माण होत आहेत.

नव्याने सुरू करण्यात आलेला नागपूर लॉजिस्टिक्स पार्क या प्रदेशातील पायाभूत सुविधांमधील महत्त्वाच्या उणिवा दूर करण्यासोबतच जागतिक दर्जाच्या लॉजिस्टिक्स सेवांची वाढती मागणी पूर्ण करण्यास मदत करेल. मालाची जलद वाहतूक आणि विश्वासार्ह लॉजिस्टिक्स सेवा उपलब्ध करून देणारी ही सुविधा महाराष्ट्रासह शेजारील बाजारपेठांमधील व्यवसाय, उत्पादक आणि औद्योगिक क्षेत्रांच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देईल. सुरक्षा आणि शाश्वततेप्रती आपली बांधिलकी अधोरेखित करत सेफएक्सप्रेसने या सुविधेमध्ये आधुनिक अग्निशमन यंत्रणा आणि प्रशिक्षित आपत्कालीन प्रतिसाद कर्मचाऱ्यांची व्यवस्था केली आहे. पर्यावरणपूरक दृष्टिकोनातून येथे एकात्मिक पर्जन्यजल संधारण प्रणाली, स्वतंत्र हरित क्षेत्रे आणि ऊर्जेचा वापर कमी करण्यासाठी नैसर्गिक प्रकाशाचा मोठ्या प्रमाणावर वापर अशा सुविधांचाही समावेश करण्यात आला आहे. सुव्यवस्थित कामकाज आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधांच्या बळावर नागपूर लॉजिस्टिक्स पार्क महाराष्ट्रातून देशभरातील विविध ठिकाणी मालाची जलद वाहतूक आणि पारगमन कालावधी कमी करण्यास मदत करेल. ही सुविधा सेफएक्सप्रेसच्या देशव्यापी लॉजिस्टिक्स नेटवर्कला अधिक बळकट करेल आणि प्रादेशिक आर्थिक विकासाला चालना देईल.



'केस नं. ९९'चा थरारक ट्रेलर आणि पोस्टर प्रदर्शित

वर्ल्ड डिजिटल प्रीमियरची उत्सुकता

■ मुंबई (दै. संध्या)

मराठी चित्रपटसृष्टीत आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण करणारे अजय पुरकर आता दिग्दर्शनाच्या भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहेत. अजय पुरकर आणि सई अजय पुरकर दिग्दर्शित 'केस नं. ९९' या आगामी मराठी सस्पेन्स-थ्रिलरचा ट्रेलर आणि पोस्टर आज प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटातून दिग्दर्शनाच्या क्षेत्रात नवी वाटचाल सुरू करत अजय पुरकर यांनी एका रहस्यमय आणि उत्कंठावर्धक कथेला पडद्यावर मांडले आहे. या चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर १६ ऑक्टोबर २०२६ रोजी अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर होणार आहे.

अजय पुरकर, चिन्मय मांडलेकर आणि मृण्मयी देशपांडे यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाची कथा एका अनपेक्षित घटनेपासून सुरू होते. एका मृत्यूभोवती निर्माण होणारे प्रश्न, त्यामागचं सत्य शोधण्याचा प्रयत्न आणि तपास जसजसा पुढे जातो तसतशी गुंतत जाणारी परिस्थिती यामुळे 'केस नं. ९९'मध्ये प्रेक्षकांना सुरुवातीपासूनच उत्सुकता कायम ठेवणारा थरार अनुभवायला मिळणार आहे. ट्रेलरमधून या प्रकरणाची फक्त एक झलक प्रेक्षकांसमोर आली आहे; मात्र तपास अधिकाऱ्याच्या नजरेतून पुढे जाणाऱ्या या कथेत संशयाचे जाळे आणि बुद्धीचे डावपेच यांची लढाई पहायला मिळते. या प्रकरणात नेमकं सत्य काय, कोणावर विश्वास ठेवायचा आणि या घटनांमागचं गूढ काय, याची उत्तरं चित्रपट पाहिल्यावरच मिळतील.

ट्रेलर आणि पोस्टरच्या प्रदर्शनानंतर आता 'केस नं. ९९'च्या रहस्यामागे नेमकं काय दडलं आहे, याची उत्सुकता वाढली असेलच. मात्र या प्रकरणाचा खरा उलगडा आणि कथेला मिळणारं अनपेक्षित वळण जाणून घेण्यासाठी प्रेक्षकांना १६ ऑक्टोबरपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे. 'केस नं. ९९'चा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर १६ ऑक्टोबर २०२६ रोजी केवळ अल्ट्रा झकासवर पाहता येणार आहे.



कमी वयातील महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग



■ नवी दिल्ली (दै. संध्या)

स्तनामध्ये गाठ जाणवली की अनेक महिला हा हार्मोन्समधील बदल असेल, असे समजून दुर्लक्ष करतात. काही जणी वय कमी असल्यामुळे एखादा असामान्य बदल गंभीरपणे घेत नाहीत. मात्र, अशा विचारांमुळे वेळेवर निदान आणि उपचार मिळण्यास उशीर होऊ शकतो. स्तनाचा कर्करोग फक्त जास्त वयाच्या महिलांनाच होतो, असे नाही. कमी वयातील महिलांनीही याबाबत जागरूक राहणे गरजेचे आहे. वयानुसार स्तनाच्या कर्करोगाचा धोका सामान्यतः वाढतो; परंतु कमी वय असल्यामुळे हा आजार होणारच नाही, असे नाही. त्यामुळे स्तनामध्ये होणारे बदल ओळखणे आणि गरज भासल्यास वेळ न घालवता डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. आजाराचे लवकर निदान झाल्यास योग्य उपचारांची दिशा ठरवण्यास मदत होते. अपोलो हॉस्पिटल्स पुणे येथील वरिष्ठ सल्लागार, सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट आणि हायपेक तज्ज्ञ डॉ. स्निता सिनुकुमार सांगतात, "स्तनाचा कर्करोग फक्त जास्त वयाच्या महिलांनाच होतो, हा एक मोठा गैरसमज आहे. कमी वयातील महिलांना स्तनामध्ये गाठ किंवा एखादा असामान्य बदल जाणवू शकतो; पण तो हार्मोन्समधील बदल असेल किंवा काही गंभीर नसेल, असे समजून त्या त्याकडे दुर्लक्ष करतात. स्तनामध्ये होणारे बहुतेक बदल कर्करोगाचे नसतात; तरीही त्यांची तपासणी करून घेणे आवश्यक आहे. स्तनात किंवा काखेत गाठ जाणवणे, त्वचेवर खळगा पडल्यासारखे दिसणे, स्तनाच्या आकारात बदल होणे, स्तनाग्र आत ओढले जाणे किंवा स्तनाग्रातून असामान्य स्राव होणे—अशी लक्षणे दुर्लक्षित करू नका. वेदना होत नाहीत म्हणजे सर्व काही ठीक आहे, असे नाही. माझा सल्ला सोपा आहे: घाबरू नका, पण तपासणी पुढेही ढकलू नका. केवळ वय कमी आहे म्हणून आपल्या आरोग्याबाबतच्या शंकांकडे दुर्लक्ष करू नका." कामाची धावपळ, कुटुंबाच्या जबाबदाऱ्या आणि आजाराचे निदान होण्याची भीती यामुळे अनेक महिला डॉक्टरांकडे जाणे टाळतात. आपल्या स्तनांमध्ये सामान्यतः कसे बदल होतात, याची जाणीव ठेवा. एखादा नवीन बदल दिसल्यास किंवा तो बराच काळ टिकून राहिल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या. स्तनांमधील बदलांकडे लक्ष देणे हा स्तन-जागरूकतेचा महत्त्वाचा भाग आहे. आरशासमोर उभे राहून स्तनांचा आकार, त्वचा आणि स्तनाग्रांमध्ये काही बदल आहेत का, ते पाहा. त्यानंतर बोटांच्या टोकांच्या मऊ भागाने स्तन आणि काखेचा संपूर्ण भाग हलक्या हाताने, गोलाकार पद्धतीने तपासा. गाठ, असामान्य जाडपणा किंवा इतर बदल जाणवतात का, याकडे लक्ष द्या. कुटुंबात स्तन किंवा अंडाशयाच्या कर्करोगाचा इतिहास असल्यास किंवा आनुवंशिक जोखीम माहीत असल्यास, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार वैयक्तिक तपासणी योजना आवश्यक असू शकते. नियमित स्क्रीनिंग कधी करावे, हे वय आणि जोखमीवर अवलंबून असते. मात्र, लक्षणे दिसल्यास तपासणीसाठी वयाची वाट पाहू नका. वेळेवर आरोग्यसेवा मिळणे सोपे व्हावे यासाठी अपोलो हॉस्पिटल्सचे 'नेहमी खुले. नेहमी येथे.!' या उपक्रमांतर्गत, सेवा उपलब्धतेनुसार, रविवारीही बाह्यरुग्ण विभागातील सल्ला, निदान चाचण्या, प्रतिबंधात्मक आरोग्य तपासण्या आणि फॉलो-अप सल्ला यांसारख्या सुविधा उपलब्ध असतात.

रजिस्ट्री सं. डी. एल. - 33004/99 REGD. No. D. L. - 33004/99

भारत का राजपत्र
The Gazette of India

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II - विभाग 3 - उपविभाग (ii)
Part II - Section 3 - Sub-section (ii)
प्राधिकार द्वारे प्रकाशित
PUBLISHEDD BY AUTHORITY

सं. ४८८० नवी दिल्ली, मंगळवार, सप्टेंबर 15, 2026/भाद्र 24, १९४८
No. 4880 NEW DELHI, TUESDAY, SEPTEMBER 15, 2026/ BHADRA 24, 1948

सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय

अधिसूचना

नई दिल्ली, १५ सप्टेंबर, २०२६

का.आ. 5070 (अ). : केंद्र शासन, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम 1956 (1956 चा कायदा 48) (ज्याला या ठिकाणी यानंतर उक्त अधिनियम असे म्हटले आहे) अनुसार कलम 3A चे उपकलम (1) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन या अन्वये खात्री झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या पुणे जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. 548डी जो जंक्शन एनएच-48 (जुना एनएच-4) पासून सुरु होवून तळेगाव-चाकण-शिक्रापूर-न्हावरा पर्यन्त, कि.मी. 54+000 ते 82+120 (शिक्रापूर न्हावरा खंड) एकूण लांबी 28.120 कि.मी. आहे. त्याचे पेव्ह शोल्डरसहीत चौपदरीकरण / दुपदरीकरणासाठी भूखंडांचा सोबत दिलेल्या अनुसूचीमध्ये ज्याचे संक्षिप्त वर्णन दिले आहे, त्या जमिनी संपादनाचा हेतु या अधिसूचनेद्वारे जाहीर करीत आहे.

कोणी व्यक्ती ज्याचे संपादीत होत असलेल्या जमिनीमध्ये हितसंबंध आहेत ते या अधिसूचनेचे प्रसिध्दीचे दिनांकापासून 21 दिवसांचे आत अधिनियमाचे कलम 3C मधील उपकलम (1) चे आधीन राहून वरील प्रयोजनासाठी आवश्यक जमिनीचे उपयोगाचे बाबतीत आक्षेप घेवू शकतात.

असा प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.17 पुणे, जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बी विंग, पुणे 411001 यांचेकडे लेखी स्वरुपात पुराव्यानिशी सादर करावा. त्याचे निराकरण केले जाईल आणि सक्षम प्राधिकारी आक्षेप घेणाऱ्यास त्याची बाजू व्यक्तीगतरित्या किंवा वकीलाद्वारे आपले म्हणणे मांडण्याची संधी देतील व ती ऐकून घेतली जाईल. अशा सर्व आक्षेपांबाबत त्यांची बाजू ऐकल्यानंतर व अधिक सखोल चौकशी केल्यानंतर सक्षम प्राधिकारी आवश्यकतेप्रमाणे असे आक्षेप आदेशाद्वारे स्वीकारु अथवा नाकारु शकतात.

सक्षम प्राधिकारी यांचेमार्फत अधिनियम कलम 3C चे उपकलम (2) चे आधीन राहून यासंबंधी देण्यात आलेला कोणताही आदेश अंतिम राहील.

या अधिसूचनेअंतर्गत येणाऱ्या जमिनींचे मोजणी नकाशे व इतर माहिती सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात, स्वारस्य असलेल्या व्यक्तींना पाहणी करण्यास मिळू शकतील.

अनुसूची

महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र 548 डी जो की जंक्शन एनएच-48 (जुना एनएच-4) पासून सुरु होवून तळेगाव-चाकण-शिक्रापूर-न्हावरा रस्त्यापर्यन्त कि.मी. 54+000 ते 82+120 (शिक्रापूर न्हावरा खंड) एकूण लांबी 28.120 कि.मी. आवश्यक जमिनींचे संक्षिप्त वर्णन.

अ. क्र.	गट नं / मिळकत क्र.	जमिनीचा प्रकार	जमिनीची पत	क्षेत्र हे. आर. चौमी
गावाचे नांव :- दहिवडी, ता. शिरूर, जि.पुणे				
१	२८९ पै	खाजगी	सिंचित	०.४९२२
गावाचे नांव :- शिक्रापूर, ता. शिरूर, जि.पुणे				
२	१६८ पै	खाजगी	असिंचित	०.०९
३	१६९ पै	खाजगी	सिंचित	०.०२
४	२०४ पै	खाजगी	असिंचित	०.६०
५	२०५ पै	खाजगी	असिंचित	०.२७
			एकूण	**१.४७२२**

Sd/-
Deputy Collector
(Land Acquisition), No. 17, Pune

जाहिरात क्र. जिमाका/पुणे/जाहिरात/२८९/२०२६-२०२७

जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे निरगुडे, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व आसपासचे पंचक्रोशीतील लोकांना आमचे आशिल श्री. दिलीप सुरेश शिंदे, रा. निरगुडे, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी सांगितलेवरुन व दिलेल्या माहितीवरुन या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

आमचे आशिल व त्यांचे बंधू श्री. अनिल सुरेश शिंदे, रा. निरगुडे, ता. जुन्नर, जि. पुणे यांचेमध्ये खालील नमूद मिळकतीबाबत वाद चालू आहे. सदर खाली परिशिष्ट 'अ' या वडिलोपार्जीत मिळकतीबाबत मा. उपविभागीय अधिकारी सो. जुन्नर-आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे) यांचेकडे आर. टी. एस. अपील क्र. २२६/२०२६ असे प्रलंबीत आहे. असे असताना आमचे आशिलांचे बंधू श्री. अनिल सुरेश शिंदे हे मा. मंडलाधिकारी सो, जुन्नर यांचेकडील वादातीत मंजूर फेरफार नं. ३८७६ अन्वये वरील नमूद परिशिष्ट अ या मिळकतीबाबत काही खरेदी, विक्री, गहाण, बक्षीस, दान, लिज किंवा तत्सम स्वरुपाच्या व्यवहार करणेच्या विचारात आहे. वास्तविक खाली परिशिष्ट 'अ' मध्ये आमचे आशिलांचा कायदेशीर अविभक्तात हिस्सा आहे. तसेच परिशिष्ट 'ब' ही मिळकत आमचे आशिलांचे स्वतंत्र मालकी हक्काची व ताबेवहिवाटीची घर मिळकत असून त्यांचेशी वर नमूद आमचे आशिलांचे बंधू श्री. अनिल सुरेश शिंदे यांचा कुठल्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध नव्हता व नाही.

खाली नमूद परिशिष्ट 'अ' या वडिलोपार्जीत शेत मिळकतीबाबत मा. उपविभागीय अधिकारी सो. जुन्नर-आंबेगाव उपविभाग मंचर यांचेकडे मा. मंडलाधिकारी सो. जुन्नर यांचेकडील मंजूर फेरफार नं. ३८७६ बाबत वाद प्रलंबीत असल्याने खाली परिशिष्ट 'अ' तसेच परिशिष्ट 'ब' ही आमचे आशिलांची स्वतंत्र मालकी हक्काची व ताबेवहिवाटीच्या मिळकती आहे. त्याबाबत इसम नामे आमचे आशिलांचे बंधू श्री. अनिल सुरेश शिंदे यांचेबरोबर खाली मिळकतीबाबत कुणीही कसल्याही तन्हेचा अगर प्रकारचा व्यवहार म्हणजे खरेदी, गहाण, विक्री, दान, बक्षीस, लिज अगर तत्सम स्वरुपाचा व्यवहार करु नये अगर खालील नमूद मिळकत परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' बाबत लेखी अगर तोंडी स्वरुपात रक्कम देवून व्यवहार करु नये. जर कुणी अशा प्रकारचा व्यवहार श्री. अनिल सुरेश शिंदे यांचेबरोबर अगर त्यांचेमार्फत नमूद व्यक्तीबरोबर करेल अगर केला असेल तर तो व्यवहार बेकायदेशीर होईल व सदरचा व्यवहार हा आमचे आशिलांवर व त्यांचे हितसंबंधी यांचेवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कुणाचीही फसवणूक होवू नये म्हणून आमचे आशिल सदरील जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत.

परिशिष्ट 'अ'

मिळकतीचे वर्णन :- तु. पुणे, पो. तु. ता. व पं. स. जुन्नर, जि. प. पुणे पैकी ग्रामपंचायत निरगुडेचे हद्दीतील मिळकत खालीलप्रमाणे,

ग.नं.	क्षेत्र हे. आर	आकार रु. पै.
२२९	०.२२	०.४८

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत त्यातील झाडझाडोरा तदंगभूत वस्तू व जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह व इजमेंटरी राईटसह तसेच इतर सर्व अधिकारासह असलेली दरोबस्त मिळकत.

परिशिष्ट 'ब'

मिळकतीचे वर्णन :- तु. पुणे, पो. तु. ता. व पं. स. जुन्नर, जि. प. पुणे पैकी ग्रामपंचायत निरगुडेचे हद्दीतील ग्रामपंचायत घर मिळकत खालीलप्रमाणे,

ग्रा.प.मि.नं.	क्षेत्र (वर्णन)
१२१	दगड, विटा, माती बांधकाम, २ पडव्या, शौचालय, घर कौलारु, एकूण क्षेत्रफळ १०८० चौ. फूट. घर खण ५.

येणे प्रमाणे वर्णनाची ग्रामपंचायत घर मिळकत त्यातील अंगभूत वस्तू, लाकूड फाटा, लाईट कनेक्शन, नळ कनेक्शन तसेच जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह व इजमेंटरी राईटसह तसेच इतर सर्व अधिकारासह असलेली दरोबस्त मिळकत.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस

दि. १३/१०/२०२६

सही/-

दिलीप सुरेश शिंदे तर्फे

ॲड. संदीप दत्तात्रय जगताप

संदिप दत्तात्रय जगताप

ॲडव्होकेट
शिवमुद्रा बंगला , बारव
जुन्नर ता.जुन्नर जि. पुणे ४१०५०२
मोबा. ९९६०३७०१७३



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६
दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

रक्तदान शिबिरासह विविध स्पर्धांनी कार्यक्रमात रंगत



■ पिंपरी: (दै. संध्या)

महानगरपालिकेच्या ४४ व्या वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या पिंपरी येथील प्रशासकीय इमारतीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी महापौर रवि लांडगे यांच्या उपस्थितीत प्रांगणातील अण्णासाहेब मगर यांच्या प्रतिमेस तसेच पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे,अतिरिक्त आयुक्त कुलदिप जंगम,तृप्ती सांडभोर,विक्रांत बगाडे,मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे,मुख्य लेखा परिक्षक प्रमोद भोसले,सह आयुक्त मनोज लोणकर,शहर अभियंता मनोज सेठीया,मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे,मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे,उप आयुक्त अण्णा बोदडे,सचिन पवार,व्यंकटेश दुर्वास,संदीप खोत,पंकज पाटील,सह शहर अभियंता बापू गायकवाड,विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी दत्ता सुर्यवंशी, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबन झिंजुर्डे,उपाध्यक्षा सुप्रिया जाधव,महादेव बोत्रे तसेच विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या दिवंगत अण्णासाहेब मगर यांच्या कार्याचे स्मरण करत महापालिकेच्या लोकसेवेला यावेळी उजाळा देण्यात आला. औद्योगिक नगरीपासून आधुनिक आणि वेगाने विकसित होणाऱ्या शहरापर्यंतचा पिंपरी-चिंचवडचा प्रवास हा दूरदृष्टी, सातत्यपूर्ण विकासकार्य आणि नागरिकांच्या सहभागातून घडला असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

महानगरपालिकेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित रक्तदान शिबिराच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमातून समाजाप्रती असलेली जबाबदारी अधोरेखित करण्यात आली. वर्धापन दिनाचा आनंद साजरा करतानाच समाजहिताच्या उपक्रमांना प्राधान्य देण्याचा सकारात्मक दृष्टिकोन या आयोजनातून दिसून आला. रस्सीखेच स्पर्धेतून संघभावनेचे दर्शन; पैठणीच्या खेळाने वाढवली रंगत वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

थोडक्यात पण महत्वाचे



अग्रसेन महाराज जयंती साजरी

चिंचवड: दैनिक संध्या

महाराजा अग्रसेन जयंतीनिमित्त महाराजा अग्रसेन ट्रस्ट चिंचवड प्राधिकरणच्या वतीने अग्रभूषण पुरस्कार, शोभयात्रा, विद्यार्थी सत्कार अशा विविध उपक्रमांनी अग्रसेन महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. अग्रसेन महाराजांच्या प्रतिमेची रथातून मिरवणूक भेळ चौक ते काळे मैदान निगडी या मार्गे काढण्यात आली. ही शोभयात्रा भेळ चौकाजवळ असलेल्या प्रेमचंद मित्तल यांच्या घरासमोर विश्रांती घेतल्यावर यावेळी अग्रसेन महाराजांची आरती संपन्न झाली. कै.काळे मैदानावर असलेल्या तुळजाई मंदिराजवळ या शोभायात्रेची सांगता करण्यात आली. यावेळी आमदार अमित गोरखे, उपमहापौर शर्मिला बाबर यांनी अग्रसेन महाराजांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले. संध्याकाळी दुचाकी रॅली काढून सर्व आग्रवाल समाज अग्रेसन भवन चिंचवड येथे पोचले. अग्रसेन भवन मध्ये विविध पुरस्काराचे वितरण करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ बालकिशन आग्रवाल, डॉ. रमेश बन्सल, अग्रसेन ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रेमचंद मित्तल,विनोद बन्सल, मोहन गर्ग, वेदप्रकाश आगरवाल, रामअवतार आगरवाल, आगरवाल, ट्रस्टचे अध्यक्ष धर्मेंद्र आग्रवाल, सचिव सुनील जयकुमार आग्रवाल,खजिनदार विनोद मित्तल, कार्याध्यक्ष विकास गर्ग, अनिता जैन आदी पदाधिकारी उपस्थित होते.

जपान दूतावास सहकार्याने पीसीसीओई मध्ये 'नो जपान २०२६' कार्यक्रमाचे आयोजन

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे जपानच्या मुंबईतील वाणिज्य दूतावास सहकार्याने 'नो जपान २०२६' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पीसीसीओईच्या आंतरराष्ट्रीय संबंध कक्ष आणि जपान सुविधा केंद्राद्वारे होणाऱ्या या पाचव्या आवृत्तीचे उद्घाटन शुक्रवारी, (दि. १६ ऑक्टोबर) सकाळी १०:३० वाजता होईल. सर्वांसाठी मोफत असून पूर्व नाव नोंदणी आवश्यक आहे. जपान एक्सटर्नल ट्रेड ऑर्गनायझेशन चे प्रतिनिधी, उद्योग तज्ञ मार्गदर्शन करतील. ते जपान मधील उच्च शिक्षण, शिष्यवृत्ती, इंटर्नशिप, प्लेसमेंट, करिअरचे मार्ग, तांत्रिक प्रगती, उद्योगाच्या अपेक्षा आणि जपानी कार्यपद्धती याबद्दल माहिती देतील. जपान मधील उद्योग, शिक्षण, संस्कृती, शैक्षणिक, व्यावसायिक आणि सांस्कृतिक संधीं बद्दल माहिती दिली जाईल. हा उपक्रम पीसीसीओईच्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय ओळख निर्माण करून देण्यासाठी आणि जागतिक शैक्षणिक, संशोधन व करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या चालू असलेल्या प्रयत्नांना पूरक आहे. भारतातील विद्यार्थी आणि जपानमधील शैक्षणिक संस्था व उद्योग यांच्यात अधिक सामंजस्य आणि सहभाग वाढवण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून विकसित झाले आहे असे उपक्रम विद्यार्थ्यांना व्यापक जागतिक दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करतात अशी माहिती पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी दिली. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

टीव्हीएस रॅडियन (TVS Radeon) ही एक दमदार, तरुणांना आकर्षित करणारी नवीन बाईक सादर

पिंपरी : दैनिक संध्या

भारतात सणासुदीच्या काळाची सुरुवात होत असताना, दुचाकी आणि तीन-चाकी वाहनांच्या निर्मितीमधील जागतिक आघाडीची कंपनी आणि टीव्हीएस वेणूचा भाग असलेल्या टीव्हीएस मोटर कंपनीने आज नवीन टीव्हीएस रॅडियन सादर केली आहे. ही बाईक एका नव्या आणि आकर्षक (डायनॅमिक) डिझाइनसह आली आहे. ११ लाखांहून अधिक ग्राहकांच्या पसंतीस उतरलेल्या टीव्हीएस रॅडियन या बाईकची नवीन आवृत्ती, तिच्या आधीच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणवत्तेला कायम राखत, एक आधुनिक आणि ग्राहकांच्या आकांक्षांना साजेसे असे नवीन डिझाइन सादर करते. गेल्या काही वर्षात, बदलत्या भारतासोबतच टीव्हीएस रॅडियनचे ग्राहकही प्रगत झाले आहेत. वाढत्या आकांक्षा, बदलती जीवनशैली आणि नवनवीन अनुभवांचा वाढलेला सहवास यामुळे दैनंदिन प्रवासाच्या साधनांबाबतच्या अपेक्षांमध्येही बदल झाला आहे. हा बदल लक्षात घेऊनच नवीन टीव्हीएस रॅडियनची रचना करण्यात आली आहे. यात एक वैशिष्ट्यपूर्ण नवीन लूक (दृश्य ओळख) आणि त्यासोबतच टीव्हीएस रॅडियनची ओळख असलेली मजबूती, उपयुक्तता आणि दैनंदिन वापरासाठीची अष्टपैलू क्षमता यांचा सुरेख संगम साधण्यात आला आहे. टीव्हीएस रॅडियन एक नवीन, ताजेतवाने डिझाइन सादर करते, ज्यामध्ये फ्युएल टँक, साईड पॅनल आणि रिअर काउलमध्ये महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. ठळक आणि दिशादर्शक डिझाइनमुळे मोटरसायकलला रस्त्यावर एक आधुनिक आणि आत्मविश्वासपूर्ण अस्तित्व प्राप्त होते, त्याच वेळी तिचा सहजसुंदर स्वभावही कायम राहतो. पुढच्या बाजूला, वैशिष्ट्यपूर्ण सिग्नेचर लाईट असलेला नवीन पिढीचा फुल LED हेडलॅम्प गती आणि गतिशीलतेची भावना निर्माण करतो. हेडलॅम्पला पूरक असे अखंडपणे जोडलेले LED टर्न सिग्नल लॅम्प मोटरसायकलच्या आकर्षक दिसण्यात आणि आधुनिकतेत भर घालतात. मागील बाजूस सिग्नेचर घटक आणि 3D टनेल इफेक्ट असलेला नवीन LED टेल लॅम्प आहे, जो अधिक खोली आणि मागच्या बाजूला एक वैशिष्ट्यपूर्ण ओळख निर्माण करतो. LED टर्न सिग्नल लॅम्प एक स्वच्छ आणि अत्याधुनिक फिनिशसह हा लूक पूर्ण करतात.

पुण्यातील कम्युनिटीज आणि त्यांच्या सर्जनशीलतेचा गौरव

पिंपरी : दैनिक संध्या

आदित्य बिर्ला समूहाची प्रमुख कंपनी ग्रासिम इंडस्ट्रीज अंतर्गत येणाऱ्या बिर्ला ओपस पेंट्सने 'बाप्पाचा मान' या उपक्रमाच्या माध्यमातून पुण्यातील उत्सवी वातावरणाला एक नवा रंग दिला. या अनोख्या उपक्रमातून दरवर्षी बाप्पाच्या स्वागतासाठी सज्ज होणाऱ्या हाउसिंग सोसायट्यांची सर्जनशीलता, भक्ती आणि सामूहिक प्रयत्नांचा गौरव करण्यात आला. या उपक्रमाला शहरातील अनेक हाउसिंग सोसायट्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सहभागी सोसायट्यांनी आपल्या उत्सवाच्या जागांचे रूपांतर संस्कृती, सामुदायिक भावना आणि कलात्मक सर्जनशीलतेचे सुंदर दर्शन घडवणाऱ्या ठिकाणांमध्ये केले. महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय सणांपैकी एक असलेल्या गणेश चतुर्थीच्या उत्सवी भावनेतून प्रेरित 'बाप्पाचा मान' या उपक्रमांतर्गत हाउसिंग सोसायट्यांना त्यांच्या मंडपाच्या पार्श्वभूमीवर 'गणेशाज ड्रीम होम' साकारण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. या उपक्रमासाठी पुण्यातून सुमारे 227 प्रवेशिका प्राप्त झाल्या. विविध कम्युनिटीजनी आपल्या कलात्मक सजावटी, अनोख्या संकल्पना आणि आकर्षक उत्सवी सजावटीच्या माध्यमातून आपली सर्जनशीलता सादर केली.



निगडीतील अप्पूघर परिसरात ४९ झाडांची बेकायदेशीर कत्तल?

■ पिंपरी (दै. संध्या)

निगडी येथील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीच्या प्रसिद्ध अप्पूघर परिसरात ४९ झाडांची विनापरवाना कत्तल करण्यात आल्याचा आरोप आम आदमी पार्टीने केला आहे. या प्रकरणी संबंधित ठेकेदारावर तात्काळ गुन्हा दाखल करून त्याचा करार रद्द करावा, तसेच संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी 'आप'च्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात आपचे शहराध्यक्ष वैजनाथ शिरसाट यांच्यासह पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांना निवेदन दिले. आम आदमी पार्टीने दिलेल्या निवेदनानुसार, अप्पूघर चालविणाऱ्या खासगी ठेकेदाराने महापालिकेच्या उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाकडून केवळ १३ झाडांच्या छाटणीची परवानगी घेतली होती. मात्र, प्रत्यक्षात ४९ झाडांची खोडापासून कत्तल करण्यात आल्याचा आरोप पक्षाने केला आहे. हा प्रकार महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम, १९७७ चा भंग असल्याचेही पक्षाने निवेदनात म्हटले आहे. महापालिकेच्याच मालकीच्या जागेत असा प्रकार घडत असेल, तर संबंधित ठेकेदारावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असलेल्या विभागाने काय केले, असा सवाल उपस्थित करत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी 'आप'ने केली आहे. या प्रकरणातील संबंधित ठेकेदारावर महाराष्ट्र वृक्ष जतन कायदा आणि पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत तातडीने गुन्हा दाखल करावा. तसेच ठेकेदाराचा करार रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, या प्रकाराकडे दुर्लक्ष करणाऱ्या किंवा संबंधित ठेकेदाराला अभय दिल्याचा आरोप असलेल्या उद्यान व वृक्ष संवर्धन विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी.

रॅपिडो बाईक टॅक्सीवर गुन्हा दाखल करा

■ पिंपरी (दै. संध्या)

खासगी नंबर प्लेट असलेल्या दुचाकींचा टॅक्सी म्हणून वापर करून बेकायदेशीर प्रवासी वाहतूक केली जात असल्याचा आरोप करत रॅपिडो कंपनीविरोधात तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी महाराष्ट्र रिक्षा पंचायत आणि ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशन ऑफ इंडिया यांनी केली आहे. येत्या आठ दिवसांत कंपनीवर कायदेशीर कारवाई न झाल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे यांनी दिला आहे. यासंदर्भात पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) यांना निवेदन देण्यात आले. रॅपिडो कंपनीच्या बाईक टॅक्सी सेवेमुळे रिक्षाचालकांच्या रोजगारावर परिणाम होत असल्याचा मुद्दाही संघटनेने उपस्थित केला आहे.

खासगी नंबर प्लेटवरून प्रवासी वाहतुकीचा आरोप

रॅपिडो कंपनीकडून आवश्यक शासकीय परवानग्यांशिवाय खासगी नंबर प्लेट असलेल्या दुचाकींचा टॅक्सी म्हणून वापर केला जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या वाहतुकीमुळे शासनाचा कर बुडत असल्याचा दावाही संघटनेने केला आहे. संबंधित प्रकाराची चौकशी करून कंपनीवर कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी डॉ. कांबळे यांनी केली.

२०१९ मध्ये पुण्यात रिक्षाचालकांनी केलेल्या आंदोलनानंतर रॅपिडो कंपनीविरोधात गुन्हा दाखल झाल्याचा दाखला संघटनेने दिला आहे. त्यानंतर या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत कायदेशीर लढा झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. न्यायालयीन निर्णय आणि लागू असलेल्या वाहतूक नियमांचे पालन झाले पाहिजे. मात्र, पुणे शहरात पुन्हा बाईक टॅक्सी सेवा सुरू असल्याचा आरोप करत संघटनेने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या प्रकरणाची कायदेशीर तपासणी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. बाईक टॅक्सीवर कारवाई : आवश्यक परवानग्यांशिवाय सुरू असलेली बाईक टॅक्सी सेवा बंद करून संबंधितांवर कायद्यानुसार फौजदारी कारवाई करावी.

ॲपवरील भाडेदर निश्चित करावेत: हकीम समितीच्या सूत्रानुसार ऑटो आणि टॅक्सीचे भाडेदर मोबाईल ॲपमध्ये दर्शविण्याची व्यवस्था करावी. चालकांसाठी कल्याणकारी महामंडळ: रिक्षा व टॅक्सीचालकांना सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यासाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ स्थापन करावे. आरटीओ अधिकाऱ्यांसोबत झालेली चर्चा पारदर्शक पद्धतीने आणि कॅमेऱ्यासमोर पार पडल्याचे संघटनेने सांगितले. मागण्यांवर ठोस निर्णय घेऊन कायदेशीर कारवाई करण्यात आली नाही, तर रिक्षाचालकांच्या हक्कांसाठी आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असे डॉ. बाबा कांबळे यांनी स्पष्ट केले. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष आनंद तांबे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात पुणे जिल्हाध्यक्ष संतोष (नाना) गुंड, पुणे शहराध्यक्ष विलास केमसे, पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष विजय ढगारे, कार्याध्यक्ष दीपक ताठे, रिक्षाचालक उपस्थित होते.

झोपडपट्टी पुर्नवसन व निर्मुलन विभागाच्या वतीने 'शून्य कचरा कार्यालय' उपक्रमाचा शुभारंभ

■ पिंपरी: (दै. संध्या)

महापालिकेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाने 'शून्य कचरा कार्यालय' या उपक्रमाची सुरुवात करून इतर कार्यालयांसमोर आदर्श निर्माण केला आहे. पिंपरी चिंचवडसारख्या झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरात कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे हे मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक कार्यालयाने स्वतःच्या स्तरावर अशा पद्धतीने पुढाकार घेऊन कचऱ्याचे वर्गीकरण आणि योग्य विल्हेवाट लावण्यास सुरुवात केल्यास या आव्हानावर मात करण्यास मदत होईल, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी व्यक्त केले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त चिंचवड येथील झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाच्या मुख्य कार्यालयात 'शून्य कचरा कार्यालय' या उपक्रमाचा शुभारंभ अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि विक्रांत बगाडे यांच्या हस्ते करण्यात आला. शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासह कार्यालयीन स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण, योग्य विल्हेवाट आणि पर्यावरणपूरक सवयी रुजविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्तांनी चिंचवड येथील कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्पालाही भेट देऊन तेथील प्रशिक्षण उपक्रमांची पाहणी केली.



यावेळी उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त दशरथ कांबळे, कार्यकारी अभियंता शेखर गुरव, आसरा फाऊंडेशन अध्यक्षा अर्चना मोरे, कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्प व्यवस्थापक अमृता बहुलेकर, आयपीसीए प्रतिनिधी दत्ता हेंद्रे, वैभव नसुरडे, आशिष कुंभलकर तसेच महापालिका कर्मचारी आणि लाईटहाऊस प्रकल्पातील प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी शून्य कचरा कार्यालय उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करताना महापालिकेच्या इतर कार्यालयांमध्येही ही संकल्पना राबविण्याची गरज व्यक्त केली. तसेच कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्पाच्या माध्यमातून युवकांना रोजगारक्षम बनविण्यासाठी दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा आढावा घेत, रोजगाराच्या बदलत्या संधींनुसार प्रशिक्षण अधिक परिणामकारक करण्याबाबत सूचना केल्या.

अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले, झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाचे उप आयुक्त अण्णा बोदडे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेला 'शून्य कचरा कार्यालय' हा उपक्रम कौतुकास्पद आहे. पिंपरी चिंचवडसारख्या झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरात कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे हे मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक कार्यालयाने स्वतःच्या स्तरावर पुढाकार घेऊन कचऱ्याचे वर्गीकरण आणि योग्य विल्हेवाट लावण्यास सुरुवात केल्यास या आव्हानावर मात करण्यास मदत होईल. या उपक्रमाचा आदर्श घेऊन महापालिकेच्या इतर कार्यालयांमध्येही अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्पाविषयी बोलताना अतिरिक्त आयुक्त जंगम म्हणाले, युवकांना रोजगारक्षम बनविण्यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरत आहे. सध्या पिंपरी चिंचवड शहरात दहा वेगवेगळ्या ठिकाणी लाईटहाऊस प्रकल्प कार्यान्वित असून, युवकांना त्यांच्या आवडीनुसार विविध अभ्यासक्रमांचे मोफत प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक असणे ही विशेष कौतुकाची बाब आहे. बदलत्या काळानुसार रोजगाराच्या संधींमध्येही बदल होत आहेत. त्यामुळे पारंपरिक अभ्यासक्रमांपुरते मर्यादित न राहता ग्राफिक डिझायनिंग, डिजिटल मार्केटिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता, व्हिडिओ एडिटिंग आणि मोशन ग्राफिक्स यांसारख्या आधुनिक व रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जात आहे, ही सकारात्मक बाब आहे. यासोबतच युवकांना विविध परदेशी भाषांचे ज्ञान देणेही गरजेचे आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



एमआयटी महाविद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती

आळंदी : दैनिक संध्या

जागतिक सायबर सुरक्षा जनजागृती महिन्यानिमित्त आळंदी (देवाची) येथील एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात (स्वायत्त) ८ ते १० ऑक्टोबरदरम्यान तीन दिवसीय सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम उत्साहात झाला. ऑनलाइन फसवणूक टाळणे, फिशिंगचे धोके ओळखणे आणि डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. विद्यार्थी कल्याण विभागाच्या मार्गदर्शनाखाली सायबरइंटेल क्लब आणि डिझाइन ॲनालिटिक्स अँड सायबर सिक्युरिटी (डीएसीएस) विभागाने या उपक्रमाचे आयोजन केले. पहिल्या दिवशी मास्टरकार्डचे ग्लोबल हेड (एंटरप्राइज प्रोटेक्शन अँड रिजनल सिक्युरिटी) नील पार्कर आणि चीफ रिजनल सिक्युरिटी ऑफिसर व आयटी ऑडिट डायरेक्टर श्यामकुमार नायर यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. सुरक्षित पासवर्ड, ऑनलाइन गोपनीयता, फिशिंगपासून बचाव आणि डिजिटल संरक्षण याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी डिजिटल पोस्टर निर्मिती आणि सायबर जनजागृती रील स्पर्धा घेण्यात आल्या. तिसऱ्या दिवशी सोशल इंजिनिअरिंग रोल-प्लेच्या माध्यमातून ऑनलाइन फसवणुकीच्या विविध पद्धतींची माहिती देण्यात आली. समारोपप्रसंगी स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिसे, तर सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे संचालक डॉ.बी.बी.वाफारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. सहयोगी अधिष्ठाता (विद्यार्थी कल्याण) डॉ.सुनील महाजन, डीएसीएस विभागप्रमुख डॉ.बरीन शेख आणि सायबरइंटेल क्लबच्या समन्वयक गुणा धोंडवड यांनी उपक्रमाचे नियोजन केले. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत सायबर सुरक्षेबाबत जागरूकतेचा संदेश दिला.

महिला दक्षता समितीवर स्वाती मेदनकर

चाकण : दैनिक संध्या

एकात्मिक विकास समन्वय पुनर्विलोकन समिती, खेड तालुका सदस्या तथा सामाजिक कार्यकर्त्या स्वाती उल्हास मेदनकर यांची चाकण दक्षिण पोलीस ठाणे स्तरावरील महिला दक्षता समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. स्वाती मेदनकर या सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून, महिलांच्या समस्या, त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि गरजू महिलांना योग्य मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असतात. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांच्यावर चाकण दक्षिण पोलीस ठाणे प्रशासनाच्या वतीने ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून महिलांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडणे, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे तसेच पोलीस प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वय साधण्याच्या कार्यात स्वाती मेदनकर यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मेदनकर यांच्या या निवडीबद्दल राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

पिंपळसुटीत दहा एकर ऊस जळून खाक!


शिरूर : दैनिक संध्या

पिंपळसुटी (ता. शिरूर) : हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने पिंपळसुटी येथील चार शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. मुख्य विद्युत वाहिनीची तार तुटून उसाच्या शेतात आग लागल्याने सुमारे दहा एकर ऊस जळून खाक झाला. रविवारी (ता. ११) दुपारी दोनच्या सुमारास घडलेल्या या घटनेत ऊस पिकासह सुमारे एक हजार फूट पाइपलाइन आणि ठिबक सिंचन संचही जळून खाक झाला. या आगीत अंदाजे २० ते २२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज असून, बाधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी होत आहे. पिंपळसुटी येथील गट क्रमांक २७० मधील क्षेत्र क्रमांक १, २, ३ आणि ४ मधील उसाच्या शेतात मुख्य विद्युत पिंपळसुटीत साडेनऊ एकर ऊस जळून खाक! पिंपळसुटी (ता. शिरूर) : हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने पिंपळसुटी येथील चार शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. मुख्य विद्युत वाहिनीची तार तुटून उसाच्या शेतात आग लागल्याने सुमारे साडेनऊ एकर ऊस जळून खाक झाला. रविवारी (ता. ११) दुपारी दोनच्या सुमारास घडलेल्या या घटनेत ऊस पिकासह सुमारे एक हजार फूट पाइपलाइन आणि ठिबक सिंचन संचही जळून खाक झाला. या आगीत अंदाजे २० ते २२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज असून, बाधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी होत आहे. पिंपळसुटी येथील गट क्रमांक २७० मधील क्षेत्र क्रमांक १, २, ३ आणि ४ मधील उसाच्या शेतात मुख्य विद्युत वाहिनीची तार तुटल्याने आग लागली. सुरुवातीला बाळासाहेब फराटे यांच्या उसाने पेट घेतला. त्यातच जोरदार वारा सुटल्याने आगीने रौद्र रूप धारण केले. आगीच्या ज्वाळा वेगाने शेजारील शेतांमध्ये पसरल्याने रावसाहेब फराटे, मानसिंग फराटे आणि अनिकेत आप्पासो फराटे यांच्या उसालाही आगीने वेढले. दरम्यान, गट क्रमांक २७१/१ मधील सुनील बाळासाहेब फराटे यांचाही सुमारे एक एकर ऊस या आगीत जळाला. वाऱ्याचा वेग आणि आगीची तीव्रता यामुळे काही वेळातच मोठ्या क्षेत्रातील ऊस भस्मसात झाला. या आगीत तोडणीला आलेल्या उसाचे मोठे नुकसान झाले आहे. उसाच्या उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी केलेली मशागत, खते, औषधे, पाणी आणि मजुरीवरील गुंतवणूक वाया गेली आहे. त्यातच सुमारे एक हजार फूट चार इंची पाइपलाइन आणि ठिबक सिंचन संच जळाल्याने सिंचन व्यवस्थेचेही नुकसान झाले आहे.

भोरमध्ये शासकीय आणि खासगी जागेतून दगड चोरीचा आरोप

भोर : दैनिक संध्या

भोर तालुक्यातील मौजे भोर येथील गट क्रमांक १४३ आणि मौजे वेनवडी येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या गट क्रमांक १८८ मधून बेकायदेशीररीत्या दगड उत्खनन व वाहतूक होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी सुनील अशोक भेलके, अनिल रविकांत भेलके, विशाल सतीश भेलके आणि उदय नारायण भेलके यांनी ११ ऑक्टोबर रोजी तक्रार अर्ज दाखल करून संबंधितांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, भोर येथील गट क्रमांक १४३ ही जमीन भेलके कुटुंबाची वडिलोपार्जित मालमत्ता आहे. या जमिनीतून छगन तुकाराम धोत्रे, संदीप छगन धोत्रे आणि दीपक छगन धोत्रे हे महसूल विभागाची दिशाभूल करून परवानगीशिवाय दगड उत्खनन व वाहतूक करीत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. संबंधित व्यक्ती गट क्रमांक १४२ मधील उत्खननासाठी परवानगी असल्याचे भासवून भेलके कुटुंबाच्या गट क्रमांक १४३ मधून तसेच वेनवडी येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या गट क्रमांक १८८ मधून दगड काढत असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. या प्रकाराबाबत यापूर्वीही संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तक्रारीनुसार, गट क्रमांक १४२ ला जाण्यासाठी रस्त्याचा प्रश्न असून, लगतच्या भोर येथील गट क्रमांक १४१ व १४३ आणि वेनवडी येथील गट क्रमांक १८८ यांच्या हद्दींची अधिकृत मोजणी अद्याप प्रलंबित आहे. हद्द निश्चिती झालेली नसताना चुकीची मोजणी दाखवून खासगी तसेच शासकीय जागेतून दगड उत्खनन आणि वाहतूक केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास बाब आणून देऊनही प्रभावी कारवाई झाली नसल्याची तक्रारदारांची भूमिका आहे.



पुढील २५ वर्षात आरोग्यदायी अन्नाचे सर्वात मोठे आव्हान

■ पुणे (दै. संध्या)

प्लास्टिक नावाचा मोठा राक्षस आपण आणला आहे. जमिनीखाली पाणी जायचे बंद केले आणि जमिनीवर पाणी आणून ठेवले, ही उद्याच्या भविष्यकाळात सर्वात मोठी धोक्याची घंटा आहे. त्यामुळे पुढील २५ वर्षात आरोग्यदायी अन्नाचे सर्वात मोठे आव्हान आपल्यासमोर आहे, असे मत पद्मश्री पोपटराव पवार यांनी व्यक्त केले.

श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग तर्फे सार्वजनिक नवरात्रोत्सवात मंदिरामध्ये 'अन्नदाता शक्ती : महाराष्ट्राच्या विविध भागातील महिला शेतकरी व कृषी उद्योजिकांचा सन्मान' करण्यात आला. यावेळी ट्रस्ट च्या विश्वस्त व उत्सव प्रमुख डॉ.तृप्ती अग्रवाल, भरत अग्रवाल, प्रविण चोरबेले, ॲड. प्रताप परदेशी यांसह विश्वस्त व पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या विविध भागातील कृषी उद्योजिका सुनिताराजे पवार, पूजा बोडके, प्रिया जाधव, वैशाली भरणे, शेतकरी पूनम गावडे, अश्विनी ताजणे, सुरेखा माने, सुरेखा बनकर, वैशाली पवार, उद्योजिका डॉ.कृष्णा सोनी, हर्षदा टेमगिरे, श्रावणी बोडके यांचा सन्मान करण्यात आला. महावस्त्र, सन्मानचिन्ह देऊन महिलांना गौरविण्यात आले. तसेच त्यांच्या हस्ते देवीची आरती देखील झाली.

पोपटराव पवार म्हणाले, मातृत्व शक्ती आणि आपली भूमाता याकरिता आपण म्हणतो 'इडा पिडा टळो व बळीचे राज्य येवो', कारण बळी हाच सर्वांचा पोशिंदा आहे. पोशिंदा हाच या सृष्टीमध्ये सर्वश्रेष्ठ असतो. आदिमानवापासून आपण स्थलांतरित शेती आपण करत होतो. कालांतराने माणसाने संरक्षित पाण्याचा शोध लावला आणि सुरुवातीला नदीपात्रात वाळू मध्ये शेती सुरु झाली. त्यानंतर पाणी शोधून शेतात काम सुरु झाले. ही प्रगती होत गेली असली तरी देखील आपल्यासमोर आज अनेक आव्हाने आहेत, असेही त्यांनी सांगितले.

भरत अग्रवाल म्हणाले, शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नाही. तर, ती आपली संस्कृती, परंपरा असून अर्थव्यवस्थेचा भक्कम आधार आहे. शेतीव्यवस्थेत महिलांचे मोठे योगदान आहे. ऊन, पाऊस सगळ्या संकटांवर मात करीत शेतकरी कार्यरत राहतात. त्यामुळेच या शेतकरी महिला व कृषी उद्योजिकांचा गौरव करणे अभिमानास्पद आहे. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त परिस्थितीत महालक्ष्मी मंदिरातर्फे आम्ही निवडक १० गावांमध्ये पाण्याचे नियोजन आम्ही करीत आहोत, असेही त्यांनी सांगितले.

गणेशोत्सवात दागिने चोरणारी हरियाणाची टोळी गजाआड

■ पुणे (दै. संध्या)

साडेचार हजार किलोमीटर पाठलाग करून कारवाई

गणेशोत्सव आणि विसर्जन मिरवणुकीतील गर्दीचा फायदा घेऊन दागिने चोरणाऱ्या हरियाणातील आंतरराज्य टोळी विश्रामबाग पोलिसांनी उघडकीस आणली. पोलिसांनी सुमारे साडेचार हजार किलोमीटरचा पाठलाग करत गुजरात पोलिसांच्या मदतीने पलवल (हरियाणा) येथील तिघांना अटक केली. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली आलिशान कार आणि चोरलेला मुद्देमाल असा सुमारे २३ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.



अजय समशेर कोळी (वय-२०), अमन समशेर कोळी (वय-२४) आणि दीपक समशेर सापसिंग (वय-२१, सर्व रा. पलवल, हरियाणा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विश्रामबाग पोलिस ठाण्यात दागिने चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास पथकाने आरोपींचा माग काढला असता ते हरियाणातील असल्याचे निष्पन्न झाले. संशयितांना गुजरातच्या अरवली पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती मिळताच विश्रामबाग पोलिसांनी तेथे तिघांना ताब्यात घेतले. तपासात त्यांनी गणेशोत्सव आणि विसर्जन मिरवणुकीत गर्दीचा गैरफायदा घेत नऊ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपींकडून गुन्ह्यासाठी वापरलेली १० लाख रुपयांची कार आणि १३ लाख रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई अतिरिक्त पोलिस आयुक्त राजेश बनसोडे, परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त कृषिकेश रावले यांच्या सूचनेनुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक नवनाथ जगताप यांच्यासह सहाय्यक निरीक्षक उमेश कारके, उपनिरीक्षक सत्यवान गेंड, मेहबूब मोकाशी आणि पोलिस अंमलदारांच्या पथकाने केली.

घटस्फोटानंतर माजी पत्नीच्या फेसबुक खात्याचा गैरवापर

■ लोणी काळभोर (दै. संध्या)

घटस्फोटानंतर माजी पत्नीच्या जुन्या फेसबुक खात्याचा गैरवापर करून तिचा आणि तिच्या मित्राचा वैयक्तिक फोटो फेसबुकवर अपलोड केल्याचा प्रकार हवेली तालुक्यातील थेऊर येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी अभिजित उदय देशमुख (रा. थेऊर, ता. हवेली) याच्याविरुद्ध लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोशल मीडियावर फोटो अपलोड करून बदनामी केल्याचा आरोप संबंधित महिलेने केला आहे. याप्रकरणी ३५ वर्षीय महिलेने पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला आणि अभिजित देशमुख यांचा विवाह २०२३ मध्ये झाला होता. मात्र, कौटुंबिक वादातून दोघांचा कायदेशीर घटस्फोट झाला. त्यानंतर संबंधित महिला आपल्या आई-वडिलांकडे राहू लागली.

१७ ऑगस्ट २०२६ रोजी महिलेच्या एका मित्रामार्फत तिच्या जुन्या फेसबुक खात्यावर तिचा आणि मित्राचा एकत्रित वैयक्तिक फोटो अपलोड केल्याची माहिती तिला मिळाली. या फेसबुक खात्याचा पासवर्ड माजी पतीकडे असल्याने, त्यानेच खात्याचा गैरवापर केल्याचा संशय महिलेने व्यक्त केला.

कवठे येमाईत भक्तिमय उत्साह

■ कवठे येमाई,(दै. संध्या)

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे श्री मळगंगा देवी शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, या महोत्सवामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात देवीच्या दर्शनासाठी तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.आश्विन शुद्ध प्रतिपदा ते विजयादशमी या कालावधीत देवीच्या उपासनेला विशेष महत्त्व असते. याच धार्मिक परंपरेचे जतन करत मळंगगा ग्रुप, घोडेआळी व समस्त ग्रामस्थ, कवठे येमाई यांच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाच्या कालावधीत दररोज सकाळी सनई वादन, गोंधळी आरती आणि महापूजा, तसेच सायंकाळी सनई वादन, आरतीपूजा, नैवेद्य आणि गोंधळ असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. याशिवाय विविध भजनी मंडळांच्या सहभागातून भजनसेवा, कीर्तन आणि इतर धार्मिक कार्यक्रम सादर केले जाणार आहेत.



अवसरी खुर्द येथील सरकारी ओढ्यावरील अतिक्रमण हटविले

■ महसूल विभागाची मोठी कारवाई, शेतकऱ्यांना दिलासा

■ मंचर (दै. संध्या)

भोरमळा-अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथील सरकारी ओढ्यामध्ये प्लॉटधारकांनी केलेले अतिक्रमण महसूल विभागाने सोमवारी (ता. १२) हटविले. ओढ्याचा नैसर्गिक प्रवाह अडविल्यामुळे पावसाचे पाणी शेतात शिरून विहीर कोसळली होती. तसेच गायमुख-भोरमळा मार्गे अवसरी खुर्द या वर्दळीच्या रस्त्याची वाहतूकही बंद झाली होती. प्रशासनाच्या कारवाईमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. भोरमळा परिसरातील ओढ्यावर नऊ ते दहा जणांनी अतिक्रमण करून पाण्याचा प्रवाह अडविल्याची तक्रार शेतकरी निवृत्ती भोर, हनुमंत भोर व इतर शेतकऱ्यांनी ता. २३ एप्रिल रोजी घोडेगाव तहसीलदार कार्यालयाकडे केली होती. त्यानंतर महसूल विभागाने नोटिसा बजावल्या. मात्र, संबंधित अतिक्रमणधारक सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे ता. ९ जून रोजी प्रभारी तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी अतिक्रमण हटविण्याचे आदेश मंडलाधिकारी आरती खरे यांना दिले होते. खरे यांनी अतिक्रमण धारकांना नोटीस देऊन आठ दिवसांत अतिक्रमण स्वखर्चाने काढण्याचे निर्देश दिले होते. अन्यथा सोमवारी (ता. १२) कारवाई करण्याचा इशारा दिला होता. कारवाईला स्थगिती मिळावी, यासाठी अतिक्रमण धारकांनी प्रांताधिकाऱ्यांकडे धाव घेतली. मात्र, शेतकऱ्यांनी पुराचे पाणी, विहिरीचे नुकसान आणि रस्ता बंद झाल्याची वस्तुस्थिती मांडली. तहसीलदार राहुल सारंग यांनीही घटनास्थळी पाहणी केली. कारवाईला स्थगिती मिळाली नाही. सोमवारी (ता. १२) मंडलाधिकारी आरती खरे, मंचर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार तानाजी हगवणे, पोलीस हवालदार मंगल पंचरास, कामगार तलाठी रामदास केदारी, माजी सरपंच प्रसाद कराळे, माजी उपसरपंच सुरेंद्र भोर, पोलीस पाटील संतोष शिंदे, दत्तात्रय भोर, महेश भोर व ग्रामस्थांच्या उपस्थितीत अतिक्रमण हटविण्यात आले.



पुरंदर तालुका स्काऊट-गाईड संघनायक प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

■ सासवड(दै. संध्या)

भारत स्काऊट्स आणि गाईड्स, पुणे जिल्हा कार्यालय, शिक्षण विभाग जिल्हा परिषद पुणे आणि हुतात्मा उमाजी नाईक विद्यालय, भिवडी यांच्या संयुक्त विद्यमाने पुरंदर तालुक्यातील एकदिवसीय स्काऊट-गाईड संघनायक प्रशिक्षण शिबिर हुतात्मा उमाजी नाईक विद्यालय, भिवडी येथे उत्साहात संपन्न झाले. या शिबिरामध्ये स्काऊट-गाईड संघनायक, उपसंघनायक आणि युनिट लीडर्स असे एकूण १५७ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. शिबिराचे उद्घाटन राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य,राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव आणि जिल्हा सहआयुक्त स्काऊट राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुंबई स्कूल्स अँड एम्प्लॉईज सेकंडरी शिक्षक पतसंस्थेचे उपाध्यक्ष सुधाकर जगदाळे, पुणे जिल्हा स्काऊट-गाईडच्या सरचिटणीस मीनल जाधव, पुरंदर तालुका स्काऊट-गाईड समन्वयक रमेश बोरावके आदी मान्यवर उपस्थित होते.



उद्घाटनप्रसंगी प्राचार्य नंदकुमार सागर यांनी स्काऊट-गाईड ही जागतिक स्तरावरील गणवेशधारी चळवळ असून, या चळवळीत साहस, शिस्त, प्रामाणिकपणा आणि राष्ट्राभिमान यांचा संगम असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीचे संस्कार रुजविण्याबरोबरच त्यांच्यात सामाजिक बांधिलकी आणि देशसेवेची भावना निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य स्काऊट-गाईड चळवळ करते. देशाच्या हितासाठी आणि संरक्षणासाठी प्रत्येकाने सदैव तत्पर राहिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. शिबिराच्या प्रमुख ,सहाय्यक लीडर ट्रेनर मीनल जाधव यांनी प्रशिक्षणाची जबाबदारी पार पाडली. उपस्थित मान्यवरांचा सन्मान विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधाकर जगदाळे यांनी केला. जिल्हा संघटक दिगंबर कारंडे, उषा हिवराळे आणि रूपाली अरु यांनी शिबिराच्या नियोजनासाठी विशेष मार्गदर्शन केले.

दिवसभर चाललेल्या प्रशिक्षणामध्ये मीनल जाधव आणि रमेश बोरावके यांनी स्काऊटर्स व गाईड्सना विविध प्रकारच्या गाठी बांधण्याचे तंत्र, शिस्तीचे महत्त्व, स्ट्रेचर तयार करण्याच्या पद्धती, बँडेजचे प्रकार, टाळ्यांचे विविध प्रकार, एकांकिका सादरीकरण, संस्कारक्षम गीते, मनोरंजनपर गीते आणि देशभक्तिपर गीतांचे प्रशिक्षण दिले. तसेच जलजागृतीविषयक प्रबोधनात्मक नाटिकेद्वारे पर्यावरण आणि जलसंवर्धनाचा संदेश देण्यात आला. स्काऊट-गाईड चळवळीचा इतिहास आणि विद्यार्थ्यांचे मनोगत यांनाही यावेळी स्थान देण्यात आले. विविध उपक्रमांमुळे प्रशिक्षणार्थींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आणि त्यांना प्रत्यक्ष कृतीतून नेतृत्व, सहकार्य, शिस्त व सेवाभावाचे धडे मिळाले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील प्रवीण तांदळे, अबोली भोंगळे, पवार सर, गायकवाड सर तसेच तालुका समन्वयक रमेश बोरावके, संजय भिंताडे, वळवी सर, फडतरे मॅडम, कासुर्डे सर, खोपे सर, दुर्गाडे एस. एस. आणि शालेय कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. समारोपप्रसंगी कन्या शाळा, सासवडचे मुख्याध्यापक सागळे सर, प्रवीण खैरनार आणि संजय कटके यांच्या हस्ते सहभागी स्काऊटर्स व गाईड्सना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कटके यांनी केले. प्रास्ताविक रमेश बोरावके यांनी केले, तर राजाराम पिसाळ यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

थोडक्यात पण महत्वाचे



कांजूरमार्ग पूर्व येथे मराठी दांडिया; महिलांसाठी मोफत देवीदर्शन मोबाईल

मुंबई : दैनिक संध्या

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रभाग क्रमांक ११८, कन्नमवार नगर-टागोर नगर यांच्या वतीने 'उत्सव मराठी मनाचा, निष्ठेचा, परंपरेचा' या संकल्पनेतून विक्रोळी विधानसभा क्षेत्रात मराठी दांडिया आणि महिलांसाठी मोफत नवरात्र देवीदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव ११ ते १९ ऑक्टोबरदरम्यान सुरू राहणार आहे. कांजूरमार्ग (पूर्व) येथील परिवार मैदानावर दररोज मराठी दांडियाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्यांसाठी मोबाइल फोन, सोन्याची नथ आणि पैठणी साडी अशी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. नवरात्रोत्सवानिमित्त महिलांसाठी महालक्ष्मी, दगडी चाळ, आर्थर रोड, तेजुकाया, गणेश गल्ली आणि शिंदेवाडी येथील देवींच्या दर्शनाची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. या सुविधेसाठी कन्नमवार नगर येथील शिवसेना शाखा क्रमांक १ व २, साई मंदिर आणि टागोर नगर, विक्रोळी (पूर्व) येथून बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे सौजन्य आमदार सुनीलभाऊ राऊत यांचे आहे. प्रभाग क्रमांक ११८ च्या नगरसेविका सुनीता चंद्रशेखर जाधव आणि स्थानिक शिवसेना पदाधिकाऱ्यांनी नागरिकांना उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. नवरात्रोत्सव आणि विजयादशमीनिमित्त आयोजित या उपक्रमातून मराठी संस्कृती आणि परंपरेला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी आयोजकांकडे संपर्क साधता येईल.

डी बिअर्स इंडिया'कडून नात्याचा नवा अध्याय साजरा; 'लव्ह फ्रॉम हबी' कलेक्शन सादर

मुंबई : दैनिक संध्या

वैवाहिक जीवनात अनेक आनंदाचे प्रसंग येतात. लग्न,लग्नाचा वाढदिवस,मुलांचा जन्म हे अविस्मरणीय क्षण अनुभवायला मिळतात. हे क्षण मोठ्या थाटामाटात आणि उत्साहात साजरे केले जातात. संपूर्ण कुटुंब या आनंदाचा भाग बनते. या अखंड प्रवासात येणा-या एका महत्त्वाच्या टप्प्याबाबत मात्र कोणाचेही लक्ष जात नाही. मुले मोठी झाल्यानंतर शिक्षण, नोकरी-व्यवसायासाठी घराबाहेर जातात. वर्षानुवर्षे मुलांची धावपळ, कलकलाटात व्यस्त असलेले घर अचानकपणे शांत होते. या काळात नवरा-बायकोला उतारवयात पुन्हा नव्याने जगण्याची संधी मिळते. एकमेकांसाठी पुरेसा वेळ मिळतो. मोकळी जागा, स्वातंत्र्य मिळते. आयुष्याचा हा टप्पा एकत्र अनुभवत एकमेकांना नव्याने शोधण्याची सुंदर संधी मिळते. 'डी बिअर्स इंडिया'ने आयुष्यातील हा टप्प्याला 'लव्ह, फ्रॉम हबी' ही नवी ओळख दिली आहे. कंपनीने खास या टप्प्यातील उतारवयातील जोडप्यांसाठी 'लव्ह, फ्रॉम हबी' हे अभियान सुरु केले आहे. हे अभियान दांपत्याच्या आयुष्यातील या नव्या आणि सुरेख टप्प्याचा आनंद साजरा करण्याचे निमंत्रण देते. या अभियानांतर्गत १ कॅरेटच्या नैसर्गिक सॉलिटेअर रिंग्सचे खास कलेक्शन लाँच करण्यात आले आहे. या बदलाचे स्वागत करण्यासाठी पतीकडून पत्नीला हे गिफ्ट देता येईल. या टप्प्यातही पत्नीवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी ही अर्थपूर्ण भेट ठरेल, असा विश्वास 'डी बिअर्स इंडिया'कडून व्यक्त करण्यात आला. ही संकल्पना भारतातील उच्चभ्रू कुटुंबांमध्ये घडणा-या सकारात्मक बदलांचे प्रतीक ठरली आहे. मुले शिक्षण आणि करिअरसाठी घराबाहेर पडल्यानंतर पती-पत्नीच्या आयुष्यात नवा टप्पा सुरु होतो. या काळात त्यांच्याकडे एकमेकांसाठी पुरेसा वेळ असतो. घरात मोकळी जाता असते. या टप्प्यात आर्थिक स्थैर्य असल्याने पैशांची चणचण नसते. 'लव्ह फ्रॉम हबी' हे अभियान या टप्प्याकडे नव्या दृष्टीकोनातून पाहते. वृद्धापकाळातही जोडप्यांनी स्वतःच्या नात्याला प्राधान्य देत एकमेकांसोबतच येत्या काळाचे नियोजन करावे, आपले छंद जोपासावे, प्रवास करावा आणि नव्या आठवणी तयार कराव्यात, यासाठी हे अभियान जोडप्यांना प्रेरणा देते. आई-वडिलांच्या भूमिकेपलीकडे जात स्वतःच्या सुंदर नात्याचा उत्सव साजरा करण्यासाठी ही उत्तम संधी ठरते. या मोहिमेबद्दल 'डी बिअर्स इंडियाचे' कंट्री हेड तोरांज मेहता यांनी माहिती दिली. "देशातील प्रत्येक घरांतील अनुभव ध्यानात घेत ही संकल्पना आकारात आली आहे. कुटुंबातील पती-पत्नी नेहमीच इतरांच्या आनंदाला प्राधान्य देतात. उतारवयातीत टप्पा हा फक्त त्यांच्यासाठी राखीव असतो. लव्ह,फ्रॉम हबीद्वारे आम्हांला याच आनंदाचा उत्सव साजरा करायचा आहे. आपल्या जोडीदारावर पुन्हा नव्याने प्रेम निर्माण होणे हे फारच रोमँटिक आहे. हे खरे प्रेम व्यक्त करण्यासाठी खास वस्तू हवी. निसर्गातून तयार झालेला आणि कायम टिकणारा नैसर्गिक हिरा हा प्रेमाचे सुंदर आणि अर्थपूर्ण प्रतीक असतो." या शब्दांत मेहता यांनी आपले विचार मांडले. हे अभियान देशातील सधन कुटुंबाच्या बदल्या इच्छा ध्यानात घेत आखण्यात आली आहे. या कुटुंबांतील प्राधान्यक्रम लक्षात योग्य वेळी या मोहिमेचे आयोजन करण्यात येत आहे. मोहिमेच्या आयोजनाकरिता 'डी बिअर्स इंडिया डायमंड अक्विझिशन स्टडी २०२५' चा अहवालाचा अभ्यास करण्यात आला. या अहवालानुसार, भारतीय नात्यातील महत्त्वाचे टप्पे साजरे करण्यासाठी तसेच जोडीदारावरील प्रेम व्यक्त करण्यासाठी नैसर्गिक हिरे खरेदी करतात. ही आवड येत्या काळात वाढत जाईल. २०२५ साली वार्षिक २० हजार अमेरिकन डॉलरपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या भारतीय कुटुंबांची संख्या ३ कोटी २० लाखांवर नोंदवली गेली. २०३० पर्यंत ही संख्या दुप्पटीने वाढत ६ कोटी ७० लाखांवर पोहोचेल, असा अंदाजही व्यक्त करण्यात आला आहे.

सोनी सबच्या 'यादे'च्या सेटवर आपल्या लाडक्या मित्रांसोबत वेळ घालवण्याबद्दल गुलकी जोशीचे मनोगत

मुंबई : दैनिक संध्या

सोनी सबच्या 'यादे' मालिकेत सध्या एक पूर्णपणे नव्या जगाचा अनुभव पाहायला मिळत आहे, कारण डॉ. देव मेहता (इक्बाल खान) सामुदायिक सेवेसाठी किल्लारी गावात स्थलांतरित झाला आहे. या नव्या पार्श्वभूमीमुळे मालिकेला एक नवा ताजेपणा मिळाला असला, तरी सेटवर काही गोंडस छोट्या पाहुण्यांचेसुद्धा आगमन झाले आहे, जे अल्पावधीतच कलाकार आणि तांत्रिक टीमचे आवडते बनले आहेत. अलीकडेच काही खोडकर पिल्लांनी अनपेक्षितपणे सेटवर हजेरी लावली आणि क्षणार्धात सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. सेटवर इकडे-तिकडे फिरणारे हे उत्सुक छोटे पाहुणे पाहता पाहता शूटिंगच्या दिवसातील सर्वांत आनंददायी भाग बनले. शॉट्सच्या मधल्या वेळेत ही पिल्ले आनंदाने इकडे-तिकडे धावताना, कलाकार आणि तांत्रिक टीमसोबत खेळताना तसेच त्यांच्याकडे थोडेसे लक्ष देणाऱ्या प्रत्येकाजवळ जाताना दिसतात. विशेषतः गुलकी जोशी आणि इक्बाल खान यांना त्यांच्या या लाडक्या मित्रांसोबत काही अतिरिक्त क्षण घालवण्याचा मोह आवरत नाही. त्यामुळे ते अनेकदा त्यांच्या सीन्समधून थोडासा ब्रेक घेऊन या पिल्लांना प्रेमाने कुशीत घेताना दिसतात. डॉ. सृष्टीची भूमिका साकारणारी गुलकी जोशी म्हणाली, "सगळ्यात मजेशीर गोष्ट म्हणजे पिल्लं सेटवर येताच आम्ही सगळे काही मिनिटांसाठी आपण काय करत होतो हेच विसरून जातो. सीन्सच्या मधल्या वेळेत मी अनेकदा त्यांना कुशीत घेते आणि त्यांच्यासोबत थोडावेळ खेळते. ती खूपच उत्सुक असतात आणि आनंदाने तुमच्या मागे फिरतात.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा अधिक सक्षम करा

■ पुणे (दै. संध्या)



महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अधिक सक्षम, प्रभावी आणि नागरिकाभिमुख करण्याची मागणी नागरिक सोशल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. शासकीय सेवा वेळेत न मिळणे, 'आपले सरकार' पोर्टलवरील तांत्रिक अडचणी, प्रलंबित अर्ज आणि अधिकाऱ्यांवरील मर्यादित कारवाई यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे संस्थेने म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर कायद्यात आवश्यक सुधारणा करण्यासाठी विविध मागण्या आणि शिफारशी महाराष्ट्र तसेच केंद्र शासनाकडे सादर करण्यात आल्या आहेत. अशी माहिती नागरिक सोशल फाऊंडेशनचे ॲड. सीए निलेश खत्री यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी नागरिक सोशल फाऊंडेशनचे विश्वस्त अमेय सप्रे, प्रीतम थोरवे, सर्वेश मेहेंदळे आदि उपस्थित होते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत नागरिकांना निर्धारित कालमर्यादेत शासकीय सेवा मिळण्याचा कायदेशीर अधिकार आहे. मात्र, कायदा लागू होऊन सुमारे अकरा वर्षे झाली तरी त्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्याची गरज असल्याचे संस्थेने नमूद केले आहे. सध्या संबंधित अधिकाऱ्यांवर कमाल पाच हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद असून, या दंडाचा पुरेसा प्रतिबंधात्मक परिणाम होत नसल्याने दंडाची रक्कम अधिकाऱ्यांच्या वेतनाशी जोडण्याची शिफारस करण्यात आली आहे.

निश्चित कालमर्यादेत सेवा उपलब्ध न झाल्यास विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी २५० रुपयांचा स्वयंचलित दंड आकारावा. तसेच, दंडाची रक्कम प्रथम संबंधित नागरिकाला नुकसानभरपाई म्हणून देऊन नंतर दोषी अधिकाऱ्याकडून वसूल करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. अपील प्राधिकरणांनी वेळेत निर्णय न घेतल्यास त्यांनाही जबाबदार धरून दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद करण्यावर संस्थेने भर दिला आहे.

'आपले सरकार' पोर्टलवर एकूण १,१६५ सेवांपैकी अनेक सेवा अद्याप उपलब्ध नसल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. सर्व अधिसूचित शासकीय सेवा एकाच पोर्टलवर उपलब्ध करून देण्यासह 'सिंगल साइन-ऑन' सुविधा लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. एका लॉगिनद्वारे विविध विभागांच्या सेवा मिळाल्यास नागरिकांचा वेळ वाचेल आणि स्वतंत्र पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे होणारा त्रास कमी होईल, असे संस्थेचे म्हणणे आहे.पोर्टलमधील तांत्रिक बिघाडामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रक्रियेवरही परिणाम झाल्याची उदाहरणे समोर आली आहेत. दहावीच्या परीक्षेत क्रीडा क्षेत्रातील कामगिरीसाठी मिळणाऱ्या अतिरिक्त गुणांच्या प्रक्रियेत तांत्रिक अडचणींमुळे सुमारे ३,६०० विद्यार्थ्यांना फटका बसल्याचा संदर्भ संस्थेने दिला आहे. तसेच, पुणे महापालिकेच्या 'पीएमसी केअर २.०' प्रणालीवरील प्रलंबित तक्रारी आणि ऑनलाइन अर्जांवर 'रिकन्साइल अँड री-सबमिट' यांसारखे अस्पष्ट शेरे दिल्यामुळे नागरिकांना होणाऱ्या अडचणींकडेही लक्ष वेधण्यात आले आहे.

संस्थेने सर्व शासकीय सेवांसाठी २१ दिवसांची निश्चित कालमर्यादा लागू करावी, निर्धारित वेळेत निर्णय न झाल्यास नियमानुसार 'डीम्ड अप्रूव्हल'ची तरतूद करावी आणि तातडीच्या सेवांसाठी स्वतंत्र जलदगती व्यवस्था निर्माण करावी, अशी शिफारस केली आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी प्राधान्याने सेवा, सुलभ प्रक्रिया आणि विशेष संरक्षण देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

याशिवाय, दुसरे अपील दाखल करण्याची मुदत ६० दिवस करणे, अपील आदेशांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर स्वयंचलित कारवाई करणे, वारंवार गैरपालन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आणि प्रलंबित अर्जांची माहिती सार्वजनिक करणे, अशा उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. प्रत्येक विभागात समन्वयासाठी नोडल अधिकारी नियुक्त करून अर्जांची स्थिती, प्रलंबित प्रकरणांचा कालावधी आणि सेवा वितरणाची कार्यक्षमता दर्शविणारी ऑनलाइन यंत्रणाही विकसित करण्याची मागणी करण्यात आली आहे.लोकसेवा हक्क हा केवळ कायद्यातील अधिकार न राहता नागरिकांना प्रत्यक्ष अनुभवता येणारा हक्क बनला पाहिजे. त्यासाठी पारदर्शकता, निश्चित कालमर्यादा, प्रभावी तक्रार निवारण आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणारी यंत्रणा आवश्यक असल्याची भूमिका नागरिक सोशल फाउंडेशनने मांडली आहे.

एचडीएफसी बँके तर्फे फेस्टिव्ह ट्रीट्स २०२६ ची सुरुवात- १०,००० हून अधिक आकर्षक ऑफर्स

■ मुंबई, : (दै. संध्या)

एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे आज त्यांच्या वार्षिक अशा फेस्टिव्ह ट्रीट्स २०२६ मोहिमेच्या सुरुवातीची घोषणा केली, यामुळे आता देशभरांतील सणासूदीच्या दिवसांची खरी सुरुवात झाली आहे. संपूर्ण देशभर चालणाऱ्या या वार्षिक महोत्सवात बँके ग्राहकांना तर्फे त्यांची कर्जे, कार्ड्स, बचत आणि चालू खात्यांसह, कार्डांवर ईझीईएमआय सारख्या १० हजारांहून अधिक ऑफर्स दिल्याने सणासुदीची खरेदी अधिक परवडणारी आणि प्रोत्साहक ठरणार आहे.

यावर्षीच्या एचडीएफसी बँक फेस्टिव्ह ट्रीट्सचा विषय 'ट्रीट विथ ऑल युवर हार्ट' असा असून या विषयानुसार आपल्या प्रियजनांची काळजी, प्रेम हे खरेदीतून व्यक्त करण्यावर जोर देण्यात आला आहे. बँके तर्फे एक्सप्रेस पर्सनल लोन्स, एक्सप्रेस कार लोन्स आणि अन्य वाहनांसाठीची कर्जे, होम लोन्स, गोल्ड लोन्स, स्पेशल सेव्हिंग्ज अकाऊंट्स आणि सर्वसमावेशक व्यावसायिक बँकिंग उपाय देणाऱ्या माय बिझनेस सारख्या उत्पादनांवर आकर्षक ऑफर्स देण्यात आल्या आहेत. ग्राहकांना आता एचडीएफसी बँकेच्या क्रेडिट कार्डासह डेबिट/क्रेडिट कार्डावरील ईझीईएमआय च्या पर्यायाने खरेदी करुन ७०,००० रुपयांपर्यंतची बचत करण्याची संधी प्राप्त होणार आहे. फेस्टिव्ह ट्रीट्स च्या ऑफर्स या तयार कपडे, इलेक्ट्रॉनिक्स, प्रवास, होम डेकोर, दागिने आणि अशा अन्य उत्पादनांसाठी उपलब्ध असणार आहे. बँकेने एलजी इलेक्ट्रॉनिक्स, गुगल पिक्सेल, सॅमसंग, वनप्लस, विजय सेल्स, क्रोमा, रिलायन्स डिजिटल, मेकमाय ट्रिप,मिंत्रा, रिलायन्स सेंट्रो, वर्ल्ड ऑफ टायटन, रॉयल ओक, होंडा, जीआरटी ज्वेलर्स आणि जोयालुकास अशा विविध ब्रॅन्ड्स बरोबर भागीदारी केली आहे. या वर्षीची ही मोहिम टप्या टप्प्याने देशातील सर्व भागात सुरु करण्यात येत असून दिवाळी मध्ये या उपक्रमाची सांगता होणार आहे.

या दृष्टिकोना मुळे देशभरांतील सर्व ग्राहकांना योग्य वेळी या ऑफर्सचा लाभ घेता येणार आहे. त्याच बरोबर बँके ने विविध सेलिब्रिटीज आणि इन्फ्लुएन्सर्स बरोबर करार करुन व्हर्च्युअल मास्टर क्लासेसच्या माध्यमून त्यांच्या प्रेक्षक/ फॉलोअर्स ना गेटिंग रेडी फॉर दिवाली, प्लानिंग फॉर रिटायरमेंट, फॉलोइंग अ पॅशन, सेव्हिंग्ज फॉर द नेक्स्ट हॉलिडेज आणि अशा अन्य विषयांवर माहिती दिली जाणार आहे.

पिंपरी-चिंचवडमधील चार गावांची भूमापनाची पायपीट थांबली!

■ पिंपरी-चिंचवड : (दै. संध्या)

महापालिका हद्दीतील बोपखेल, डुडूळगाव, चऱ्होली बुद्रुक आणि चोवीसावाडी ही चार गावे नगर भूमापन अधिकारी, पिंपरी-चिंचवड कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. यामुळे नागरिकांची जमीन अभिलेखांच्या कामांसाठी होणारी धावपळ थांबणार आहे, अशी माहिती भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिली.

राज्य सरकारने भूमी अभिलेख विभागाच्या नव्या रचनेत राज्यभरात जिल्हा अधीक्षकांची ८ आणि नगर भूमापन अधिकाऱ्यांची २३ नवीन कार्यालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या सुधारित रचनेतील नगर भूमापनची नवीन कार्यालये १५ जूनपासून कार्यान्वित झाल्याचे वृत्त आहे. पुणे जिल्ह्यासाठी नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३ व ४ ही कार्यालये मंजूर झाली. मात्र कार्यक्षेत्र ठरवताना ही चारही गावे नगर भूमापन अधिकारी क्रमांक ४, पुणे या कार्यालयाशी जोडण्यात आली. प्रत्यक्षात ही गावे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत असल्याने स्थानिक, भूमिपुत्र आणि मिळकतधारकांना दूरच्या कार्यालयाशी संपर्क साधावा लागत होता.

ही गैरसोय लक्षात घेऊन आमदार लांडगे यांनी ९ जून २०२६ रोजी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र दिले. गावे महापालिका क्षेत्रात असल्याने पिंपरी-चिंचवड नगर भूमापन कार्यालयाशी संपर्क साधणे नागरिकांना सोयीचे आहे, असे त्यांनी पत्रात नमूद केले होते. प्रशासकीय कामकाज अधिक परिणामकारक व गतिमान करण्यासाठी ही गावे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात घ्यावीत आणि सुधारित शासन निर्णय काढावा, अशी मागणी त्यांनी केली होती.

'मेन ऑफ प्लॅटिनम' या ब्रँडअंतर्गत दागिन्यांचा नवीन संग्रह केला सादर

■ पुणे : (दै. संध्या)

प्लॅटिनम गिल्ड इंटरनॅशनल (पीजीआय) इंडियाने 'मेन ऑफ प्लॅटिनम' या ब्रँडअंतर्गत दागिन्यांचा नवीन संग्रह सादर केला आहे. या संग्रहात साखळ्या, पेंडंट्स, ब्रेसलेट्स आणि अंगठ्यांचा समावेश असून, पुरुषांच्या यशाच्या प्रवासातील विविध टप्पे आणि त्यांच्याशी निगडित मूल्ये लक्षात घेऊन हे डिझाइन्स तयार करण्यात आले आहेत. ब्रँडच्या नव्या मोहिमेत भारतीय क्रिकेटपटू रोहित शर्मा आणि संगीतकार अनिरुद्ध रविचंदर या संग्रहाचे प्रतिनिधित्व करत आहेत.

'मेन ऑफ प्लॅटिनम'च्या या नव्या संग्रहात ठळक आणि आकर्षक दागिन्यांसोबतच दैनंदिन वापरासाठी योग्य अशा हलक्या व आधुनिक डिझाइन्सचाही समावेश आहे. सुबक आकार, भौमितिक रचना, एकमेकांत गुंफलेले दुवे आणि रंग व फिनिशमधील आकर्षक विरोधाभास यांमधून वैयक्तिक शैलीचे वेगळेपण अधोरेखित होते. प्रतिष्ठा आणि यशाचे प्रतीक ठरणाऱ्या दागिन्यांपासून ते दैनंदिन व्यक्तिमत्त्वाचा भाग बनणाऱ्या दागिन्यांपर्यंत विविध पर्याय या संग्रहात उपलब्ध आहेत. रोहित शर्मा यांची संयमी वृत्ती आणि नेतृत्वगुण यश टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेली मूल्ये आणि व्यक्तिमत्त्व अधोरेखित करतात. दुसरीकडे, अनिरुद्ध रविचंदर यांचा स्वतःवरील विश्वास, सर्जनशीलता आणि सातत्याने प्रगती करण्याचा दृष्टिकोन यशाच्या प्रवासातील महत्त्वाचे पैलू दर्शवतो. या दोघांचे वेगवेगळे प्रवास आणि त्यांच्या वैयक्तिक शैलीतून व्यक्त होणारी मूल्ये यांचा सुंदर मेळ या संग्रहात साधण्यात आला आहे. या संग्रहातील प्रत्येक दागिन्याच्या केंद्रस्थानी प्लॅटिनम ही मौल्यवान धातू आहे.

थेरगाव येथे नाल्यावर बांधला गृहप्रकल्प, अजिंक्य बारणे यांची कारवाईची मागणी

■ पुणे : (दै. संध्या)

थेरगाव येथे नाल्यावर बांधला गृहप्रकल्प, अजिंक्य बारणे यांची कारवाईची मागणी . पिंपरी : थेरगाव येथील सर्व्हे नं. २७ मध्ये एका बांधकाम व्यावसायिकाने सर्व नियम धाब्यावर बसवून थेट नैसर्गिक नाल्याचा प्रवाहच बदलल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. युनिफाइड डेव्हलपमेंट कंट्रोल अँड प्रमोशन रेग्युलेशन्स अंतर्गत नाल्याच्या दोन्ही बाजूंना ६ मीटरचा बफर झोन सोडणे बंधनकारक असताना, या नियमाचे उघडपणे उल्लंघन करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, ड्रेनेज विभागाने यापूर्वीच पत्राद्वारे धोक्याचा इशारा दिला असतानाही, महापालिकेच्या बांधकाम व स्थापत्य विभागाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत बांधकाम परवानगी दिल्याचा गंभीर आरोप होत आहे. या



संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषीवर कारवाई करण्याची मागणी वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य अजिंक्य बारणे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांकडे तक्रारीद्वारे केली आहे.

थेरगावमधील सर्व्हे नं. २७ मधून एक मोठा नैसर्गिक नाला वाहतो. कोणत्याही नैसर्गिक जलस्रोताचा प्रवाह बदलणे किंवा त्यावर बांधकाम करणे कायद्याने गुन्हा आहे. महापालिकेच्या ड्रेनेज विभागाने या जागेची पाहणी करून स्पष्ट शब्दांत लेखी पत्र दिले होते. या पत्रात म्हटले होते की, जर नाल्याचा मूळ मार्ग बदलला, तर भविष्यात या परिसरात तीव्र पुराचा धोका निर्माण होऊ शकतो.

नाल्याचा प्रवाह बदलल्यामुळे किंवा तो अरुंद केल्यामुळे नाल्याची पाणी वाहून नेण्याची क्षमता प्रचंड प्रमाणात कमी होईल. पावसाळ्यात आजूबाजूच्या परिसरात पाणी शिरून मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे नियमानुसार नाल्याच्या दोन्ही बाजूंना ६ मीटरचा बफर झोन ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

मात्र, ड्रेनेज विभागाच्या या तांत्रिक अभ्यासाला आणि इशाऱ्याला बांधकाम व स्थापत्य विभागाकडून केराची टोपली दाखवण्यात आली. दुसरा धक्कादायक प्रकार म्हणजे, संबंधित जागेत एक जुनी विहीर अस्तित्वात आहे.

लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन

■ शारदानगर : (दै. संध्या)



भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार शारदाबाई पवार आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शारदानगर येथे राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागामार्फत शनिवार, दिनांक 10 ऑक्टोबर 2026 रोजी सकाळी 10 वाजता नवमतदार नोंदणी व मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) 2026 शिबिर आयोजित करण्यात आले. महाविद्यालयातील सर्व पात्र नवमतदारांची नोंदणी करणे हा या शिबिराचा उद्देश होता. सदर शिबिराला 103 स्वयंसेवक उपस्थित होते.

याप्रसंगी माळेगाव नगरपंचायतीच्या बूथ लेव्हल ऑफिसर (BLO) रेश्मा फय्याज शेख व जिल्हा परिषद शिक्षिका छाया दिलीप गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. बी. देशमुख, उपप्राचार्य डॉ. राजकुमार सुरवसे व डॉ. परिमिता जाधव, एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. नितीन शिंदे व प्रा. मनोज निंबाळकर, तसेच प्रा. सायली बनसोडे व प्रा. पूनम बाबर आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री बालाजी लोंढे मुख्याधिकारी तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी बारामती विधानसभा मतदारसंघ यांचे मार्गदर्शन मिळाले.BLO रेश्मा फय्याज शेख व छाया दिलीप गावडे यांनी विद्यार्थिनींना मतदार नोंदणी प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. मतदार नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे, ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया आणि नवीन मतदार म्हणून नोंदणी करताना घ्यावयाची काळजी याबाबत त्यांनी माहिती दिली. विद्यार्थिनींना व्हिडिओद्वारेही मार्गदर्शन करण्यात आले.उपप्राचार्य डॉ. राजकुमार सुरवसे यावेळी म्हणाले, "महाविद्यालयातील हा उपक्रम भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत आहे. युवा मतदारांची नोंदणी करणे आणि मतदानाविषयी जनजागृती करणे हा सदर कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. वयाची 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी याद्वारे मार्गदर्शन केले जाते."कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज निंबाळकर यांनी केले. निवडणूक साक्षरतेतील एनएसएसचे योगदान, मतदार शपथ आणि युवा मतदार नोंदणीचे महत्त्व त्यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य असून लोकशाही परंपरेचे जतन व निवडणुकीचे पावित्र्य राखण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वयाची 18 वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी मतदार म्हणून नोंदणी करावी आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. प्रथम वर्ष व द्वितीय वर्षातील एनएसएस स्वयंसेवकांनी शिबिरात सहभाग घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एनएसएस सदस्य प्रा. सायली बनसोडे व प्रा. पूनम बाबर यांनी विशेष परिश्रम घेतले.

थोडक्यात पण महत्वाचे



सेवा सेतू अभियानात २५७८ ग्राहकांनी घेतला सूर्यघर योजनेचा लाभ

पुणे : दैनिक संध्या

महावितरणच्या सेवा सेतू अभियानांतर्गत पुणे परिमंडलात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या २५७८ वीजजोडण्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. तसेच ६०,८०४ वीजपुरवठा तक्रारी आणि ११,९९२ वीजबिल तक्रारी निकाली काढण्यात आल्या असून, ग्राहकांच्या नावात बदल करण्याची ४५१२ प्रकरणे पूर्ण करण्यात आली आहेत. वीजपुरवठा यंत्रणा सक्षम करण्यासाठी २३४ रोहित्रेही बदलण्यात आली आहेत. महावितरणचे कार्यकारी संचालक दिनेश अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पुणे परिमंडलाचे प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्या नेतृत्वाखाली अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत गणेशखिंड मंडलात ७१४, पुणे ग्रामीण मंडलात १११८ आणि रास्तापेठ मंडलात ७४६ वीजजोडण्या कार्यान्वित झाल्या आहेत. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत ३१६ सौर कृषी पंप कार्यान्वित करण्यात आले असून, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलार (SMART) योजनेअंतर्गत ११ वीजजोडण्या देण्यात आल्या आहेत. अभियानांतर्गत नवीन वीजजोडण्यांची ४४२५ प्रकरणे आणि ग्राहकांच्या नावात बदल करण्याची ४५१२ प्रकरणे पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच वीजपुरवठा खंडित होण्याच्या ६०,८०४ आणि वीजबिलासंदर्भातील ११,९९२ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. वीजपुरवठ्याची गुणवत्ता आणि विश्वासार्हता वाढविण्यासाठी पुणे ग्रामीण मंडलात १८१, गणेशखिंड मंडलात ४४ आणि रास्तापेठ मंडलात ९ अशी एकूण २३४ रोहित्रे बदलण्यात आली आहेत. ग्राहकांना सुलभ सेवा देणे, प्रलंबित कामे मार्गी लावणे आणि सौरऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

समर्थ शैक्षणिक संकुलाच्या खेळाडूंची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी

नारायणगाव: दैनिक संध्या

समर्थ शैक्षणिक संकुल, बेल्हे येथील विद्यार्थ्यांनी विविध जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. क्रिकेट, रायफल शूटिंग, कुस्ती आणि मैदानी क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी विविध क्रमांक मिळविले असून, काही खेळाडूंची विभागीय स्तरावरील स्पर्धांसाठी निवड झाली आहे. फुलगाव, पुणे येथे झालेल्या १९ वर्षाखालील मुलांच्या जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत समर्थ ज्युनिअर कॉलेज, बांगरवाडी-बेल्हेच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. या संघातील विघ्नेश पवार, ओम रोकडे आणि चिराग झिंजाड यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच, शिरूर येथील सीताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये झालेल्या जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत इशिता काकडे हिने प्रथम क्रमांक मिळवत विभागीय स्पर्धेत स्थान मिळविले. इंदापूर तालुक्यातील लोणी देवकर येथे झालेल्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत समर्थच्या महिला कुस्तीपटूंनीही चांगली कामगिरी केली. समृद्धी जाधव हिने ६५ किलो, तन्वी जाधव हिने ७२ किलो आणि समीक्षा माळी हिने ७६ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक मिळविला. नारायणगाव येथे झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत तिहेरी उडी प्रकारात स्वरा लेंडे, तर २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत ईश्वरी घोलप हिने द्वितीय क्रमांक पटकावला. ४ बाय ४०० मीटर रिले स्पर्धेत स्वरा लेंडे, प्रांजल येवले, श्रावणी चौधरी आणि समृद्धी शेळके यांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. ४०० मीटर अडथळा शर्यतीत श्रावणी चौधरी हिने द्वितीय, तर समृद्धी शेळके हिने तृतीय क्रमांक मिळविला. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य आणि शिक्षकांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. या खेळाडूंना क्रीडा संचालक एच. पी. नरसुडे, क्रीडा शिक्षक सुरेश काकडे, विनायक वव्हाडी आणि अश्विनी जगदाळे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व यशस्वी खेळाडूंना पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रा. सुभाष अण्णा शेटे यांची पोलीस मित्र संघाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी नियुक्ती

कवठे येमाई : दैनिक संध्या



पोलीस मित्र संघ (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार प्रा. सुभाष अण्णा शेटे यांची राष्ट्रीय उपाध्यक्ष पदी निवड झाली असून राष्ट्रीय मीडिया प्रमुख व राष्ट्रीय ज्येष्ठ सल्लागार पदांची अतिरिक्त जबाबदारी ही त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.पोलीस मित्र संघाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. शाम व्यंकट घाडगे यांनी आज मंगळवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२६ रोजी नियुक्तीपत्र देऊन त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली. प्रा. सुभाष अण्णा शेटे हे पत्रकारिता, सामाजिक कार्य आणि जनहिताच्या प्रश्नांवर मागील २० वर्षांपासून सातत्याने कार्यरत आहेत. पत्रकार संरक्षण व माहिती अधिकार विभागाच्या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न, सामाजिक समस्या आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे कार्य करण्याची अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त करण्यात आली आहे. नियुक्ती पत्रात संघाच्या ध्येय धोरणा नुसार कार्य करणे, संघटनात्मक नियमांचे पालन करणे, संघटन अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे आणि दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करणे,असे आवाहन अध्यक्ष घाडगे यांनी केले आहे.या नियुक्तीमुळे प्रा. सुभाष अण्णा शेटे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

आमदार महेश लांडगे यांना 'क्रांतिवीर वसंतदादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार' घोषित

पुणे : दैनिक संध्या

हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांना यंदाचा 'क्रांतिवीर वसंतदादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार' घोषित करण्यात आला आहे. हिंदुत्वविषयक कार्य आणि गोरक्षणासाठी घेतलेल्या भूमिकेची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आल्याचे आयोजकांनी म्हटले आहे. रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी सात वाजता पंढरपूर येथे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. श्री विठ्ठल मंदिराशेजारील क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या पुतळ्याजवळ हा सोहळा होणार असून, चंद्रशेखर महाराज देगलूरकर आणि उपस्थित साधुसंतांच्या हस्ते आमदार लांडगे यांचा गौरव करण्यात येईल. मानाचे महावस्त्र, कुंडलिनी-कृपाणांकित भगवा ध्वज आणि अकरा हजार रुपये रोख, असे पुरस्काराचे स्वरूप आहे. क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त हिंदुत्वविषयक कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.

विद्यार्थ्यांनी श्रमदानातून बांधला वनराई बंधारा दुष्काळावर मात करण्यासाठी शासनाच्या योजनेला विद्यार्थ्यांचा हातभार

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)



महाराष्ट्र शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागामार्फत पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलसंधारणाचे काम हाती घेतले आहे. त्यासाठी पारंपारिक पद्धतीने जलसंवर्धन करता यावे या उद्देशाने श्री गुरुदत्त ग्रामविकास प्रतिष्ठानचे संभाजीराजे विद्यालय व जिजामाता वरिष्ठ महाविद्यालय आणि ग्रामपंचायत जातेगाव बुद्रुक यांच्या संयुक्त विद्यमाने गावाजवळच्या ओढ्यावर वनराई पद्धतीचा बंधारा श्रमदानातून बांधण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थी, प्राध्यापक व ग्रामस्थांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेत श्रमदानातून हा उपक्रम पूर्ण केला.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश पाणी अडवून ते जमिनीत मुरवणे, भूजल पातळी वाढवणे तसेच जलसंधारणाबाबत जनजागृती करणे हा आहे. स्वयंसेवकांनी उपलब्ध साहित्याचा वापर करून ओढा-नाल्याच्या प्रवाहात वनराई बंधारा उभारला. त्यामुळे वाहून जाणारे ओढ्यातील पाणी अडवून त्याचा परिसरातील शेती व भूजलासाठी उपयोग होण्यास मदत होणार आहे. यावेळी संभाजीराजे विद्यालयाचे प्राचार्य रामदास थिटे यांनी वनराई बंधाऱ्याचे महत्त्व स्पष्ट केले. वाहून जाणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक असून अशा छोट्या जलसंधारणाच्या कामातून भविष्यात मोठा फायदा होतो. विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षण न घेता समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सहभागी होऊन पर्यावरण व जलसंधारणाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवावे असे आवाहन त्यांनी केले. जिजामाता वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी बोऱ्हाडे यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

पाण्याचे संवर्धन ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करणारी चळवळ असून अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष श्रमाचे आणि समाजसेवेचे महत्त्व समजते असे त्यांनी सांगितले.

जलसंधारण, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामविकासाच्या विविध उपक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग भविष्यातही सक्रियपणे सहभागी राहील असे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. विजय गायकवाड यांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल उमाप, उपाध्यक्ष सुगंधराव उमाप, सचिव प्रकाशबापू पवार व अन्य पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक केले. या उपक्रमास ग्रामविकास अधिकारी लता ठुबे, प्रा. संतोष डफळ, प्रा. दत्तात्रय धस, प्रा. रोहिदास लवांडे, प्रा. महावीर भिसे, प्रा. रोहिणी जऱ्हाड , प्रा. रूपाली रासकर, प्रा. अश्विनी खंडागळे, प्रा. अक्षय पडवळ तसेच प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष श्रमदान करून 'जलसंधारण हीच काळाची गरज' असा संदेश देत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, जलव्यवस्थापन आणि ग्रामविकासाची जाणीव अधिक दृढ झाली.

पोषणमूल्ये आणि नावीन्यपूर्ण उत्पादनांसह पेप्सिको इंडियाची उत्पादन पोर्टफोलिओमध्ये परिवर्तनाची वाटचाल सुरू

■ पुणे : (दै. संध्या)

पेप्सिको इंडिया आपल्या खाद्यपदार्थ आणि पेय व्यवसायाचा विस्तार करत असताना, भारतातील ग्राहकांच्या बदलत्या आणि अधिक जागरूक होत असलेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्या उत्पादनांमध्येही बदल करत आहे. ग्राहकांना आवडणारी चव कायम ठेवून आरोग्य आणि निरोगी जीवनशैलीबाबत वाढती जागरूकता लक्षात घेऊन कंपनी अधिक आरोग्यदायी पर्यायांचा विस्तार करत आहे. यासाठी उत्पादनांच्या घटकांमध्ये बदल करणे, नवीन उत्पादने आणि प्रकार सादर करणे तसेच विविध घटकांचा वापर करण्यावर भर दिला जात आहे. यासोबतच उत्पादनांमधील पोषणमूल्ये आणि इतर वैशिष्ट्यांबाबत अधिक पारदर्शकता ठेवली जात आहे. त्यामुळे ग्राहकांना अधिक पर्याय उपलब्ध होत असून, त्यांच्या वैयक्तिक आवडीनिवडी आणि सेवनाच्या प्रसंगानुसार योग्य उत्पादन निवडण्यासाठी आवश्यक माहितीही मिळत आहे.

पेप्सिको इंडियाच्या पेय व्यवसायाने कमी आणि मध्यम कॅलरी असलेल्या पेयांच्या पर्यायांचा विस्तार करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. सध्या कंपनीच्या एकूण पेय उत्पादनांपैकी 70 टक्क्यांहून अधिक उत्पादने झिरो शुगर किंवा मध्यम कॅलरी असलेली आहेत. येत्या काळात हे प्रमाण टप्प्याटप्प्याने 90 ते 100 टक्क्यांपर्यंत नेण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. यासाठी उत्पादनांच्या घटकांमध्ये आवश्यक बदल करण्यासोबतच कमी आणि झिरो शुगर असलेल्या पेयांचे पर्याय वाढविण्यावर भर दिला जात आहे. यामध्ये पेप्सी ब्लॅक, 7अप झिरो शुगर, गेटोरेड झिरो आणि निंबूझ या पेयांचा समावेश आहे. खाद्यपदार्थांच्या क्षेत्रात पेप्सिको इंडिया पोषणमूल्ये, विविध घटक आणि तयारीच्या नवीन पद्धतींच्या माध्यमातून ग्राहकांसाठी अधिक पर्याय उपलब्ध करून देत आहे. 2026 मध्ये क्वेकर ब्रँडमध्ये नव्याने बदल करण्यात आले असून, त्यातील प्रथिने, फायबर आणि संपूर्ण धान्यांचे गुणधर्म अधिक ठळकपणे ग्राहकांसमोर मांडण्यात आले आहेत.

आरोग्यदायी पर्यायांच्या श्रेणीत रेड रॉक डेलीच्या बेक्ड प्रकारांचा समावेश आहे. यामध्ये 40 टक्के कमी चरबी आहे. तसेच, भारताच्या कृषी परंपरेचा गौरव करणारा भरडधान्य आधारित कुरकुरे ज्वारी पफ्स हा नवीन पर्यायही सादर करण्यात आला आहे.

विशेष कार्यकारी अधिकारी आणि अशासकीय समित्यांवरील नियुक्त्या कधी होणार

■ कोरेगावमुळ (: (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या विविध समित्यांवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या आणि विशेष कार्यकारी अधिकारी पदावरील नियुक्त्या नेमक्या कधी होणार, असा प्रश्न सध्या राजकीय वर्तुळात आणि कार्यकर्त्यांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी, शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि स्थानिक पातळीवर पक्षाची ताकद वाढविण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या कार्यकर्त्यांना आता संधी कधी मिळणार, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीची प्रतीक्षा कधी संपणार? महाराष्ट्र शासनाने विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीसंदर्भात सुधारित नियमावली जाहीर केली होती. राज्यात सुमारे १ लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्त करण्याची घोषणा करण्यात आली होती. या नियुक्त्यांसाठी वय, शैक्षणिक पात्रता आणि इतर निकष निश्चित करण्यात आले आहेत. नियुक्तीचा कालावधी पाच वर्षांचा असतो.

जिल्हानिहाय नियुक्त्या कधी पूर्ण होणार आणि पात्र इच्छुकांना पुढील प्रक्रिया कधी सुरू करता येणार, याबाबत स्पष्ट माहिती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. अशासकीय समित्यांवरील नियुक्त्यांचे काय? शासनाच्या विविध विभागांशी संबंधित अशासकीय समित्यांवर काम करण्याची संधी मिळावी.स्थानिक प्रश्नांची जाण, जनतेशी थेट संपर्क आणि सामाजिक कार्याचा अनुभव असलेल्या व्यक्तींना या समित्यांमध्ये स्थान मिळाल्यास शासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी होऊ शकतो.

आदर स्त्री शक्तीचा या उपक्रमाचा शुभारंभ

■ शिरूर : (दै. संध्या)



नवरात्रीच्या मंगलमय पर्वा निम्मित स्त्री शक्तीचा गौरव करण्यासाठी राबविण्यात येणारा आदर स्त्री शक्तीचा या उपक्रमाची सुरुवात शिरूर मधील प्रभाग क्र २ पासून करण्यात आली.

सदर उपक्रम शिरूर तालुका व शिरूर शहर महिला राष्ट्रवादी यांच्या वतीने सुरु करण्यात आला.तालुक्याचे मा आमदार श्री अशोक बापू पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमामध्ये संपूर्ण शिरूर शहरातील प्रत्येक वार्ड निहाय विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन दिले जाणार आहे अशी माहिती शिरूर तालुका राष्ट्रवादीच्या पूजाताई भुजबळ यांनी दिली. या वेळी प्रभाग क्र २ मधील खालील स्त्री शक्तीचा सन्मान करण्यात आला.सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली साखरे, एस. टी चालक माधुरी होळकर, आदर्श माता भारतीताई शिवानंद मास्तोळी, आदर्श अंगणवाडी सेविका अंबिका लोखंडे,एकल महिला श्रीमती वैशालीताई जामदार,साफसफाई कर्मचारी महिला श्रीमती मीनाबाई चव्हाण,आदर्श वकील सीमाताई काशिकर, सामाजिक महिला - रेश्मा शेख ,उद्योजक महिला - कल्याणी उपाध्य,होतकरू महिला - अंभगताई, कराटे -ग्रंथाली लटके.

या वेळी प्रभाग क्र 2 च्या नगरसेविका स्वप्नालीताई जामदार म्हणाल्या "प्रत्येक महिला हि जगातील सर्वोत्तम महिला असते तिला फक्त समाजाने प्रोत्साहन देण्याची गरज असते त्यातूनच देशात यशस्वी महिला घडल्या आहेत. या वेळी डॉ सुनिताताई पोटे यांनी महिलांना प्रोत्साहन मिळेल आशा योजनाची माहिती दिली.

पत्रकार चांगल्या गोष्टींना प्रसिद्धी तर वाईट प्रवृत्तींवर अंकुश ठेवण्याचे काम करतात : प्रकाश धारिवाल

■ शिरूर: (दै. संध्या)



पत्रकार समाजात घडणाऱ्या चांगल्या गोष्टींना प्रसिद्धी देतात तर चुकीच्या गोष्टींवर लेखणीच्या माध्यमातून अंकुश ठेवतात.

या समारंभात पत्रकार संघाने ज्या घटकांना सन्मानित केले ते पाहिल्यानंतर जे ना दिसे रवी ते पाहे कवी... या सुभाषिताची आठवण येते.. पत्रकार संघ करत असलेल्या कार्याकडे पाहता समाजाला दिशा देवून अनेकांना मोठे करण्याचे काम लेखणीच्या माध्यमातून करत असल्याचे मत प्रसिद्ध उद्योगपती प्रकाश धारीवाल यांनी केले. शिरूर येथे शुक्रवार दि.९ रोजी शिरूर तालुका महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्यावतीने शालेय साहित्य वाटप व विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना धारीवाल यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या सामाजिक उपक्रमात ते बोलत होते. यावेळी सिने अभिनेते सुनील गोडबोले, ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे,मितेश गादिया, स्वप्नील ढमढेरे, विठ्ठल घावटे,माजी अध्यक्ष रविंद्र ढोबळे,सुनील जाधव,डॉ.सुनीता पोटे,स्वाती साठे,स्वप्नाली जामदार,संगीता मल्लाव,सविता बोरूडे, डॉ.वैशाली साखरे,शशिकला काळे,रोहिणी बढे,गणेश कोळपकर, तुकाराम खोले,प्रशांत शिंदे,संतोष शितोळे,शरद कालेवार,निलेश जाधव,योगेश जामदार, भाऊसाहेब क्षिरसागर,गोरख गायकवाड,गणपत क्षिरसागर,प्रितेश फुलडाळे यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या पंधरा वर्षांपासून पत्रकार विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्याच्या उपक्रमाचे कौतुक उद्योगपती प्रकाश धारीवाल यांनी केले.

पत्रकार संघाचे उपक्रम कौतुकास्पद आहे.आत्तापर्यंत अनेक मोठे पुरस्कार मिळाले परंतु पत्रकारांकडून मिळालेला हा माझ्यासाठी पहिलाच पुरस्कार असल्याने त्याचा आनंद वेगळा आहे.

नीरा खोऱ्यात पाणीसाठ्याची चिंता; गेल्या वर्षीच्या तुलनेत १६ टक्क्यांनी घट

■ नीरा : (दै. संध्या)

नीरा खोऱ्यातील धरणांच्या पाणीसाठ्याबाबत चिंताजनक चित्र समोर आले आहे. पुणे पाटबंधारे विभागाच्या १३ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या अहवालानुसार, नीरा नदीच्या खोऱ्यातील वीर, भाटघर, नीरा देवघर आणि गुंजवणी या चार धरणांमध्ये मिळून सध्या ४३ हजार १९२ दशलक्ष घनफूट उपयुक्त पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत हा साठा ४८ हजार ३२९ दशलक्ष घनफूट होता. म्हणजेच, यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत ४ हजार ९१० दशलक्ष घनफूट पाणीसाठा कमी आहे. एकूण उपयुक्त पाणीसाठ्याची टक्केवारी १०० वरून ८९.८४ टक्क्यांवर आली आहे. त्यामुळे नीरा खोऱ्यातील आगामी पाणी नियोजनाचे आव्हान अधिक महत्त्वाचे ठरणार आहे.

नीरा खोऱ्यातील चार धरणांच्या पाणीसाठ्याचा विचार केला, तर भाटघर, नीरा देवघर आणि गुंजवणी धरणांमध्ये प्रत्येकी १०० टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. मात्र, वीर धरणातील पाणीसाठा गेल्या वर्षीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात घटला आहे. अहवालानुसार, वीर धरणात सध्या ४ हजार २७१ दशलक्ष घनफूट उपयुक्त पाणीसाठा असून तो क्षमतेच्या ४५.५० टक्के आहे. गेल्या वर्षी याच दिवशी वीर धरणात ९ हजार ४०८ दशलक्ष घनफूट म्हणजेच १०० टक्के उपयुक्त पाणीसाठा होता. त्यामुळे वीर धरणातील पाणीसाठ्यातील घट विशेष लक्षवेधी ठरत आहे.नीरा खोऱ्यातील या चारही धरणांतील पाण्यावर पुणे जिल्ह्यातील भोर, पुरंदर, बारामती आणि इंदापूर तालुक्यांतील शेती तसेच पिण्याच्या पाण्याच्या योजना अवलंबून आहेत. याशिवाय सातारा जिल्ह्यातील खंडाळा आणि फलटण, तर सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील शेती व पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठीही या पाणीसाठ्याला महत्त्व आहे. त्यामुळे धरणांमधील पाण्याची उपलब्धता आणि त्याचे योग्य नियोजन या भागातील शेतकरी, नागरिक आणि प्रशासनासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

सध्या तीन धरणांमध्ये पूर्ण उपयुक्त पाणीसाठा असला, तरी एकूण साठ्यात झालेली घट आणि वीर धरणातील कमी झालेली पाणीपातळी याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आगामी काळात पाऊस झाला नाही, तर शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देणे, पिण्याच्या पाण्याच्या योजनांचे नियोजन करणे आणि विविध भागांतील पाण्याची गरज भागवणे ही आव्हाने निर्माण होऊ शकतात. विशेषतः पुढील महिनाभर पाऊस झाला नाही, तर उपलब्ध पाणीसाठा किती काळ पुरणार, याबाबत चिंता वाढू शकते.

पावसाने ओढ दिल्यास रब्बी हंगामातील पिकांच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पाण्याचा काटकसरीने वापर, उपलब्ध साठ्याचे नियोजन आणि पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याची गरज भासू शकते. त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच संभाव्य पाणीटंचाईच्या दृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे.

एकूणच, नीरा खोऱ्यात सध्या ८९.३७ टक्के उपयुक्त पाणीसाठा असला, तरी गेल्या वर्षीच्या तुलनेत तो कमी आहे. धरणांतील पाण्याची सद्यस्थिती समाधानकारक वाटत असली, तरी पावसाचे पुढील चित्र आणि पाण्याची वाढती गरज यावर आगामी परिस्थिती अवलंबून राहणार आहे. त्यामुळे नीरा खोऱ्यातील शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष आता पावसाकडे लागले आहे.